www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

संपादक - संतोष शिवदास आमले
मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : ५४   रविवार, ०२ नोव्हेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514




## तेजस्विनी लोणारी आणि समाधान सरवणकर यांचा साखरपुडा सोहळा जल्लोषात संपन्न



**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई :** शिवसेना पक्षाचे उपनेते, सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व मा.सदा सरवणकर यांचे सुपुत्र, शिवसेना युवा नेते व मा. नगरसेवक समाधान सरवणकर आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री तेजस्विनी लोणारी यांचा साखरपुडा समारंभ २६ ऑक्टोबर रोजी मोठ्या थाटामाटात पार पडला.

या प्रसंगी राजकीय, सामाजिक तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नवदांपत्यावर शुभाशिर्वादांचा वर्षाव केला. कार्यक्रमाचे वातावरण आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक रंगांनी भारलेले होते.

समारंभात दोघांचे निकटचे मित्र, अभिनेते आणि दैनिक युवक आधारचे पत्रकार मयुर धुरी हे आपल्या पत्नीसह सहभागी झाले होते. साखरपुडा सोहळ्याचे आयोजन अत्यंत आकर्षक सजावट आणि पारंपरिक मराठी वातावरणात झाले होते.

तेजस्विनी आणि समाधान या नवदांपत्याला पुढील आयुष्यासाठी सर्व क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# उद्धव ठाकरेंचे मतदारांना आवाहन;

## म्हणाले, "मतचोर जिथे दिसेल तिथे फटकवला...

**दैनिक युवक आधार**

बोगस मतदार यादी, मतदान यादीत फेरफार यावरून विरोधकांकडून आज मुंबई येथे 'सत्याचा मोर्चा' काढण्यात आला. यावेळी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्रित कार्यक्रमात सहभागी झाले. राज ठाकरे यांच्या भाषणानंतर उद्धव ठाकरे यांनी भाषण केले. उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे, अमित शाह यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली. तसेच, "मतचोर जिथे दिसेल तिथे फटकवला पाहिजेच" असे आवाहनही केले.

**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

उद्धव ठाकरे म्हणाले, माझ्या आठवणीप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राच्या एकजुटीनंतर पहिल्यांदाच सर्व राजकीय पक्षांची एकजूट झाली असेल. ही विरोधी पक्षांची एकजूट नाही, लोकशाहीचे प्रतिनिधित्व करणारं आणि नेतृत्व करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांची एकजूट आहे. मतचोरी करणाऱ्यांना सांगतो, आज नुसती ठिणगी बघताय, या ठिणगीचा वणवा कधीही होऊ शकेल. या बुडाला आग लावण्याची ताकद या ठिणगीमध्ये आहे.उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना उद्देशून ॲनाकोंडा हा शब्द वापरला होता. त्याच शब्दाची आठवण करत ते म्हणाले, मध्यंतरी एक मी शब्द वापरला तो गाजला. तो कोणता ते तुम्हाला कळेल. शोलेमध्ये एक डायलॉग आहे, दूर कही रात बच्चा रोता है, माँ कहती है सोजा नही तो



गब्बर आजायेगा. आज मी तुम्हाला सांगतो जागे राहा नाहीतर ॲनाकोंडा आ आजायेगा.

**ॲनाकोंडाला कोंडावंच लागेल**

पुढे ते म्हणाले, "या ॲनाकोंडाला आता आपल्याला कोंडावंच लागेल. नाहीतर सुधारणार नाहीत. मला एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं एवढे सगळे धडधडीत पुरावे; रोज कुठून ना कुठून पुरावे येत आहेत तरी सुद्धा आपले राज्यकर्ते आणि निवडणूक आयोग.. निवडणूक आयोग तर यांचे नोकर आहेत. मी ॲनाकोंडा का बोलतोय चेष्टा मस्करी म्हणून नाही बोलत आहे.. यांची भूक शमत नाहीये. आपला पक्ष चोरला, नाव चोरलं, निशाणी चोरली, अरे माझे वडील चोरायचा प्रयत्न करत आहेत, आणि तेही पुरेसं नाही म्हणून मतचोरी करायचा प्रयत्न करत आहेत. बाकी सगळे एकत्र आलेले आहेत बाकी सत्ताधारी याच्यामध्ये कोणी आलेलं नाहीयेत."

**एकदाचं दूध का दूध पाणी का पाणी होऊदे**

देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत ठाकरे म्हणाले, "मुख्यमंत्री मध्ये म्हणाले की लोकसभेच्या वेळेला विरोधी पक्ष म्हणजे आपण कोणत्या मतदारसंघात कसा लाभ घेतला आहे याचा पर्दाफाश मी करेन. तुमच्या सगळ्यांच्या साक्षीने मी मुख्यमंत्र्यांना आवाहन देत आहे, तुम्ही आमचा पर्दाफाश कराच, करूनच टाका; एकदाचं होऊदे दूध का दूध पाणी का पाणी..पण जेव्हा मुख्यमंत्री असं बोलतायत याचा अर्थ मुख्यमंत्र्यांनी पण मान्य केलं आहे मतचोरी झालेली आहे."

ठाकरे म्हणाले, "मी तुमच्या सर्वांवर एक जबाबदारी टाकतोय सगळे पक्ष बाजूला ठेवून एकवटलो आहोत. ज्या गोष्टी आता आम्ही करत आहोत शिवसेना, मनसे, राष्ट्रवादी, कॉंग्रेस जे करत आहेत तसं मी सर्वांना आवाहन करतो आहे राज्यातील नाहीतर देशातल्या की सर्वांनी आपले नाव यादीत आहे की नाही ते पुन्हा जाऊन तपासा आणि आपल्या घरामध्ये आपल्याला न दिसणारी, आपली परवानगी न घेतलेली माणसे राहतात की नाही हे पण तपासा. कारण जर शौचालयात १०० माणसे राहत असतील तर तुमच्या घरात किती राहू शकतात?"

## पहेला येथील परतीच्या पावसाने रद्द होणारी मंडई व नाटकाचा कार्यक्रम ८ नोव्हेंबरला होणार

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा -** तालुक्यातील पहेला येथील परतीच्या पावसाने रद्द होणारा मंडईचा कार्यक्रम त्याचप्रमाणे रात्री ९ वाजता आयोजित करण्यात आलेला बाल युवा सांस्कृतिक व क्रीडा मंडळ तर्फे आयोजित करण्यात आलेला चिंगारी नाटकाचा प्रयोग हा ८ नोव्हेंबर 2025 ला होणार आहे. करिता कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक मंडळातर्फे करण्यात आलेले आहे.




## भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्काराने सौ. वसुधा नाईक सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंती दिनानिमित्त राष्ट्रीय एकात्मता दिना निमित्त दिनांक 31 ऑक्टोबर 2025 रोजी पद्मश्री मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट उरळी कांचन तर्फे आयोजित भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल पुण्याच्या राज्यसभेच्या खासदार सौ. मेघाताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.तसेच या सोहळ्याचे मुख्य आयोजक डॉ.रविंद्र भोळे व मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते हा सोहळा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक हॉल, येरवडा, पुणे येथे हा भव्य सोहळा संपन्न झाला यावेळी प्रथम



सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 105 मान्यवरांना 'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न 2025 ' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याच वेळी वसुधा फाउंडेशनच्या संस्थापिका, अध्यक्ष सौ. वसुधा वैभव नाईक, पुणे यांनाही 'हिंदू रत्न पुरस्कार 2025' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना पत्रकारितेसाठी देण्यात आला आहे. तसे वसुधा नाईक या एक उपक्रमशील शिक्षिका, सामाजिक कार्यकर्त्या, कवयित्री, लेखिका आहेत. त्याचबरोबर त्या 'आम्ही मुंबईकर 'या सामाजिक वृत्तपत्राच्या उपसंपादिका आहेत. 'शिक्षक ध्येय' या साप्ताहिकाच्या देखील उपसंपादिका आहेत. तसेच 'बिनधास्त' बातमीपत्राच्या त्या पुणे प्रतिनिधी आहेत.' साहित्य सारथी 'या वृत्तपत्राच्या देखील त्या पुणे जिल्हा प्रतिनिधी आहेत. त्यांच्या या पत्रकारितेच्या कार्या साठीच त्यांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे.

या पुरस्काराच्या वेळी आम्ही मुंबईकर सामाजिक वृत्तपत्राचे संपादक श्री प्रमोद सूर्यवंशी तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. अनेक संस्थांचे संस्थापक, सामाजिक कार्यकर्ते,शिक्षक वृंद उपस्थित होते.

## रसायनी पोलीस स्टेशन अंतर्गत राष्ट्रीय एकता दिवस व रन फॉर युनिटी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (आनंद पवार)**

भारताचे पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशात३१ ऑक्टोंबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.भारतीय एकात्मतेचे शिल्पकार पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती दिनानिमित्त संपूर्ण देशामध्ये गृह खात्यामार्फत राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांच्या निर्देशानुसार रसायनी पोलीस स्टेशन मार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. एकता



दौड चा प्रारंभ सकाळी ७:३० वाजता मोहोपाडा येथील एन. आय.एस.एम.(सेबी)च्या मुख्य प्रवेशद्वारापासून करण्यात आला.या एकता दौड मध्ये रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर,महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती.अनुसया ढोणे तसेच पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासह जय प्रेझेशन कंपनीच्या महिला अधिकारी कर्मचारी,श्री करिअर अकॅडमीचे विद्यार्थी विद्यार्थिनी,पोलीस पाटील,महिला दक्षता समितीच्या महिला पदाधिकारी तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. एकता दौड मध्ये सहभागी झालेल्या सर्वांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी स्वागत करून आभार मानले.




## "कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येत असलेल्या दिंडी व पालखी सोहळयांच गावो- गावी होत आहे स्वागत"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :** आषाढी एकादशी प्रमाणे कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने सांगली सातारा सोलापूर जिल्ह्यातील असंख्य साधुसंतांच्या पालखी व सोहळ्यांचे सध्या पंढरपूरकडे प्रस्थान झालेले आहे. या सर्व दिंडी व पालखी सोहळ्यांचे सातारा सांगली व सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात स्वागत होत असून धार्मिकतेकडे असंख्य भक्तांचा लोकांचा कल वाढत असल्याचे दिसून येत आहे. श्री संत ज्ञानेश्वरमाऊली वारकरी कार्तिक पायी दिंडी सोहळ्याचे कुसवडे ते श्रीक्षेत्र पंढरपूर या दिंडी सोहळा सातारा जिल्ह्यातून सोलापूर



जिल्ह्यात प्रवेश करताच जागोजागी त्यांचे स्वागत करण्यात आले. विसाव्यासाठी तांदुळवाडी येथील श्री खंडोबा मंदिर या ठिकाणी पालखी सोहळा थांबला असता, दिंडीतील भाविक भक्तांनी या स्वागता बाबत आनंद व्यक्त केला व आम्हाला चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळत असल्याची माहिती दिली. यावेळी ह. भ. प. मारुती बुवा जगताप महाराज ,ह. भ .प. प्रदीप शंकर सराटे (आबा), ह .भ .प. शिवाजी बापू)सराटे महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने दिंडी सोहळ्याचे आयोजन केले जात असल्याचे समजते.अशा अनेक साधू संतांच्या, महाराजांच्या पालख्या दिंड्या रामकृष्ण "हरी राम कृष्ण हरी"च्या जयघोषात, "टाळ मृदुंगाच्या गजरात"खांद्यावरती भगवी पताकी घेऊन तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे जात असताना दिसत आहेत.

## पोलीस स्टेशन गोंदिया शहर यांची अवैधरित्या बनावटी दारुच्या अडयावर धाड टाकुन जप्त केली लाखोंची बनावटी दारु व साहीत्य

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी**

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, दिनांक २९/१०/२०२५ रोजी मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे कुंदन कुटीच्या मागे, वाजपेयी चौक गोंदिया येथे अवैधरित्या बनावट दारु तयार करुन जिल्यात व जिल्हयाबाहेर विक्री केली जात आहे. या खबरेवर सपोनि/वैभव गेडाम, डी.बी. पथकाचे अंमलदार व दोन पंचांना सोबत घेवुन सदर ठिकाणी गेले असता त्याठिकाणी एक ईसम अवैध्यरित्या बनावट दारु तयार करतानी दिसुन आला. पोलीस आल्याची चाहुल लागताच त्याने पळ काळण्याचा प्रयत्न केला असता त्यास स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन विचारपुस केली असता तो बनावट दारु तयार करीत असल्याचे सांगीतले. स्टाफ व पंचा समक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव पराग रमण अग्रवाल वय ३१ वर्ष, रा. स्वागत लॉन जवळ, गणेश नगर, गोंदिया असे सांगीतले. सदर ठिकाणची पंच व आरोपी समक्ष पाहणी केली असता नमुद आरोपी हा मानवी आरोग्यास व जीवीतास धोका असलेल्या स्पौरीट फ्लेवर ईत्यादी सामानाचा उपयोग करुन बनावटी दारु तयार करीत असल्याचे दिसुन आले. सदर ठिकाणहुन नमुद आरोपी व पंचासमक्ष बनावट दारु तयार करण्यासाठी वापरण्यात येणा-या ०१) स्पौरीट रासायनिक द्रव्य, ०२) १० रॉयल स्टंग विदेशी दारुच्या पेटया ज्यामध्ये १८० एम.एल. ने भरलेले ४८ पव्वे, ०३) ०२ नग २०० ली. क्षमतेचा स्पीरीट भरलेला प्लास्टीक ड्रम,




०४) ०२ नग ५० ली. क्षमतेचा प्लास्टीक खाली ड्रम, ०५) एका प्लास्टीक बोरीमध्ये १८० एम.एल. चे ओ.सी.ब्लु. कंपनीचे ३०० नग खाली बॉटल, ०६) एका प्लास्टीक बोरीमध्ये ओ.सी.ब्लु. व रॉयल स्टंग कंपनीचे प्लास्टीक झाकण, ०७) ड्रम मधुन स्पिरीट काढण्याची ०१ मॅन्युअल मशीन, ०८) प्लास्टीक पाईप, रॉयल स्टंग व ओ.सी.ब्लु. कंपनीचे ४० नग खाली खोके, ०९) ०५ नग पिण्याच्या पाण्याची कॅन, फ्लेवर्ड कलर, १०) ०१ हुंडाई कंपनीची वेन्यु चारचाकी वाहन, ११) ०१ विवो कंपनीचा मोबाईल व ईतर साहीत्य असा एकुण ११,०५,०००/-रु. चा मुद्देमाल जप्त करुन अप क्रं. ८९८/२०२५ कलम ६५ (अ), (ब), (क), (ड), (ई), ८३, १०८ मदाका, सहकलम १२३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन आरोपीस अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोनि/किशोर पर्वते यांचे मार्गदर्शनात सपोनि/वैभव गेडाम हे करीत आहेत.

सदरची कामगीरी श्री. गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, श्री. अभय डोंगरे, अपर पोलीस अधिक्षक गोंदिया, श्रीमती. रोहीणी बानकर, उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन गोंदिया शहरचे पोलीस निरिक्षक श्री किशोर पर्वते, सपोनि/ वैभव गेडाम, श्रेणीपोउपनि/थेर, सफौ/कवलपालसिंग भाटीया, पोहवा/सतिश शेंडे, सुदेश टेंभरे, निशिकांत लोंदासे, प्रमोद चव्हाण, दिपक राहांगडाले, कमलेश राऊत, पोशि/सुभाष सोनवाने, दिनेश बिसेन, अशोक रहांगडाले, कुणाल बारेवार, मुकेश रावते, प्रमोद शेंडे, सोनु नागपुरे, राकेश बंजारे, अजय बोपचे, अमित पवार, विजय बिसेन यांनी केली आहे.

## मोटरसायकल स्लिप झाल्याने वीस वर्षीय तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

**मोटरसायकल** स्लिप झाल्याने वीस वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. सचिन राजेश पवार (वय वीस, राहणार ओवळेगाव)असे मृताचे नाव आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.



३० ऑक्टोबर रोजी पहाटे चारच्या सुमारास सचिन राजेश पवार आणि विशाल संजय जाधव (राहणार ओवळेगाव) हे यमाहा मोटरसायकल क्रमांक एम एच 21 सीबी 9880 वरून जात होते. यावेळी सचिन पवार याने मोटरसायकल भरधाव वेगाने चालवली आणि मोटरसायकल स्लिप होऊन विमानतळ रोड, लोखंडी टाकीजवळ, चिंचपाडा ब्रिज कडे जाणाऱ्या मार्गावर पनवेल येथे अपघात झाला. या अपघातात सचिन पवार याच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापती झाला. आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. तर विशाल जाधव हा जखमी झाला. या अपघातात मोटरसायकलचे नुकसान झाले.

# उदगीर प्रशासकीय अधिकारी मुंग गिळुन गप्प का ?

## भर दिपवाळी मध्ये ग्राहाकाची लुट करणाऱ्या ग्रामीण परवाना असलेला उदयगिरी गॅस एजन्सी व उदगीर मनोज गॅस एजन्सी वर कारवाई होणार का ....... ?

### छावा संघटना बालाजी भोसले यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी ( बालाजी तेलंगे )**

उदगीर तालुक्यामध्ये मनोज गॅस एजन्सी मार्फत एक हजार ते बाराशे रुपये प्रती गॅस सिलेंडर अवैध्यरित्या काळया बाजारात विक्री केले जात आहे व प्रत्येक चहाच्या टपरीवर व हॉटेलवर कमर्शियल सिलेंडर न वापरता घरगुती सिलेडर वापरत आहे. ते ही दिवसा ढवळ्या हे कोणत्या नियमानुसार वापरले जात आहे तसेच प्रत्येक सिलेंडर रिफील करत असताना मुदत संपण्या अगोदरच पाईप बदल केल्याशिवाय कोणालाच सिलेंडर दिले जात नाही व विना पासबुक धारकांना व व्यावसायिकांना छुप्या रितीने सिलेंडरची विक्री चढ्या भावाने केली जात आहे व आपले उखळ पांढरे करून घेत आहेत.

तसेच घरपोच सेवा मोफत असताना सुधा मनोज गॅस व उदयगिरी गॅस एजन्सीचे कर्मचारी हे ४० ते ५० रुपये प्रत्येक सिलेंडर मागे जास्ती ची रक्कम घेत आहेत.




त्या डिलीव्हरी बॉयला एजन्सी वेतन देत नाहीका ? एजन्सीकडे ग्राहकांचे नंबर असुन सुध्दा संपर्क साधत नाहीत घरगुती सिलेंडर वापरत असलेले मंगल कार्यालय, हॉटेल, चहाचे हॉटेल अशा अनेक ठिकाणी सरांस पणे चढ्या भावाने विक्री करीत आहेत. सिलेंडर डिलीव्हरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विचारले असता आम्ही मा. तहसीलदार साहेबांना मोठ्या प्रमाणात हप्ता देत आहे आमची चौकशी कोणताच शासकीय अधिकारी, पुरवठा अधिकारी तहसील कार्यालयामधले अधिकारी आमचे काही करत नाहीत आणि आमचे कोणीही वाकडे करु शकत नाहीत. तुम्ही कितीही पत्रव्यवहार करा त्याचा काहीच उपयोग होणार नाही असे सिलेडर वाटप कर्मचारी बोलतात. या मनोज गॅस एजन्सी उदगीर यांची व उदयगिरी गॅस एजन्सी यांची

चौकशी करुन त्या एजन्सीला सिल करून त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावे अन्यथा छावा संघटनेच्या वतीने दि.10/11/2025 रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांच्या कार्यालयासमोर आमरण करणार आसे निवेदन छावा संघटणा उदगीर तालुका संघटक बालाजी भोसले यांनी दिले .

## माळाकोळी पोलिसांनकडून राष्ट्रीय एकता दौड दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :प्रशांत ढवळे.**
**माळाकोळी(ता. लोहा )**

पोलीस ठाण्याच्या वतीने देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय एकता दौड दिवस माळेगाव येथे साजरा करण्यात आला.

माळेगाव येथील ग्रामस्थ व भारत पोलीस अकॅडमि माळेगाव चे विध्यार्थी यांच्या समवेत एकता दौड माळेगाव यात्रा येथील मुख्य रस्त्यावर करण्यात आला.



यावेळी माळाकोळी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महेश मुळीक साहेब, पो, उप. नी. रेड्डी,स. पो. उप. निरीक्षक हणमंत बोंबले, सूर्यवंशी, पोलीस कॉन्स्टेबल गुट्टे,एलपीसी पठाण,पोलीस कॉन्स्टेबल सिरसाट,डांगे, जोंधळे,कुंडगीर, भूत्तेवाड,प्रहार संघटने चे माऊली गिते,शहाजी चाटे,खंडोबा देवस्थान,ट्रस्टचे अध्यक्ष दयानंद पाटील,राजश्री शाहू संस्थे चे चेरमन राजेंद्र पाटील,पांडुरंग घोरपडे,भारत अकॅडमी चे प्रमुख गजानन पाटील,अंबादास जहागीरदार,गजानन पंढरी पाटील, प्रल्हाद धुळगंडे,गजानन पवार, सावरगाव पोलीस पाटील आदी, उपस्थिती होती.

यावेळी सहायक पोलीस निरीक्षक मुळीक साहेब व अकॅडमीचे प्रमुख गजानन पाटील यांनी उपस्थित विध्यार्थी व ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस,गावकरी,शालेय विध्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# स्वरा ढिकले हिचे सुवर्ण यश!

## राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड — आदिती घुमरेचे रौप्य पदकाने विद्यालयाचा गौरव

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड :** धुळे येथे झालेल्या जिल्हा क्रीडा विभाग आयोजित शालेय विभागीय किक बॉक्सिंग स्पर्धेत ओझर येथील होरायझन विद्यालयातील खेळाडू कुमारी स्वरा कपालेश्वर ढिकले हिने अत्युत्तम कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या चमकदार यशामुळे राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

या स्पर्धेतच तिच्याच विद्यालयातील आदिती विशाल घुमरे हिने दमदार खेळ करत रौप्य पदक जिंकत विद्यालयाचा मान आणखी उंचावला.स्वरा व आदिती यांच्या या यशामागे प्रशिक्षक आकाश बोराडे सर व राहुल गाडे सर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

स्वरा ढिकलेंच्या सुवर्ण कामगिरीनंतर शैक्षणिक, क्रीडा व राजकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.विशेष म्हणजे स्वरामध्ये असलेली खेळाडू वृत्ती वडील कपालेश्वर ढिकले यांच्याकडूनच आलेली आहे. ते स्वतः कबड्डीपटू असून सध्या निफाड पोलिस ठाण्यात पोलिस हवालदार म्हणून कार्यरत आहेत. क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी व मुलीला उंच भरारी घेण्यासाठी त्यांनी दिलेले प्रोत्साहन आणि समर्थन हा तिच्या यशाचा भक्कम आधार आहे.

स्वराच्या यशाबद्दल निफाड पोलिस निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलिस निरीक्षक सोनल फडोळ तसेच पोलिस कर्मचारी यांनी भेटून तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. भविष्यात देशासाठी उत्कृष्ट कामगिरी करावी, अशा शुभेच्छाही देण्यात आल्या.

स्वरा ढिकले आणि आदिती घुमरे यांना भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा! सय्यद पिंपरी निफाड व ओझरचा मान उंचावल्याबद्दल अभिमान.





## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचा संताप! वारंवार निवेदन देऊनही मदत मिळाली नाही

**माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊनही भरपाई न मिळाल्याने पंचक्रोशीत शेतकऱ्यांची नाराजी वाढली**

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर (ता. निफाड) :** पंचक्रोशीत मे-जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असतानाही शासनाकडून अद्याप नुकसानभरपाई न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.



या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील यांच्या माध्यमातून तहसीलदार निफाड यांना निवेदन देऊन तात्काळ भरपाई देण्याची मागणी केली आहे. अन्यथा कठोर आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पंचक्रोशीत अतिवृष्टीमुळे शेतजमिनीतील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शासनाच्या निर्देशानुसार पंचनामे करण्यात आले असूनही अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाई जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

शेतकऱ्यांनी माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि जिल्हाधिकारी नाशिक यांना निवेदनं देऊन मदतीची मागणी केली, मात्र तरीही कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही. त्यामुळे पंचक्रोशीत शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.

निफाड तालुक्यातील रुई, खेडलेझुंगे, कोळगाव, देवगाव, सारोळे थडी, नांदूर मध्यमेश्वर, गाजरवाडी, धारणगाव वीर, धारणगाव खडक, करंजी, ब्राह्मणवाडे, झुंगे बेट, तमासवाडी आदी गावांतील शेतकऱ्यांना भरपाईची प्रतीक्षा लागली आहे.

या निवेदनावर शिवाजी सुराशे, निवृत्ती गारे, गोपीनाथ ठुबे, धर्मराज घोटेकर, केदार घोटेकर, विजय गिते, योगेश घोटेकर, सचिन क्षीरसागर यांसह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शेतकऱ्यांची मागणी आहे की शासनाने तात्काळ न्याय देत भरपाई वाटप करावे, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## महाराष्ट्राच्या भूमिपुत्राला "अटल भारत गौरव" या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी**
**विजय काळे**

**सोयगाव :** गुवाहाटी (आसाम) मध्ये देशाचे दिवंगत माजी पंतप्रधान व भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने दिला सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिला जाणाऱ्या "अटल भारत गौरव" या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने जळगावचे भूमिपुत्र डॉ.निलेश राणे यांना सन्मानित करण्यात आले.डॉ.निलेश राणे यांना 'अटल भारत गौरव' राष्ट्रीय पुरस्कार आसाम विधानसभा उपाध्यक्ष श्री.नुमल मोमीन, आसाम राज्य आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष व भाजपा प्रदेश उपाध्यक्ष विजयकुमार गुप्ता आणि बॉलीवूड अभिनेता अली खान यांच्या हस्ते या भव्यदिव्य समारंभात प्रदान करण्यात आला.डॉ.निलेश राणे यांनी समाजातील वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य करताना युवकांमध्ये क्रीडासंस्कार, कृषी, शिक्षण तसेच आरोग्य जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा प्रचार-प्रसार केला आहे. त्यांच्या कार्यातून सामाजिक ऐक्य, सकारात्मकता आणि प्रगतीचा संदेश समाजात पोहोचला आहे.





या सन्मानामुळे डॉ.निलेश राणे यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर नवा गौरव प्राप्त झाला असून समाजातील विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याचप्रमाणे आपल्या भूमिपुत्र जळगाव जिल्ह्यातील सामाजिक,राजकीय,

शैक्षणिक क्रीडा.क्षेत्रातून आशा विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे त्याचप्रमाणे डॉक्टर निलेश राणे युवा प्रतिष्ठानचे जळगाव जिल्हा शिक्षक अध्यक्ष समाधान मुळे शेंगोळा यांनी सुद्धा त्यांचे अभिनंदन केले व जळगाव जिल्हा निलेश राणे युवा प्रतिष्ठानचे युवा अध्यक्ष प्रदीप पाटील बिलवाडी यांनी सुद्धा त्यांचे अभिनंदन केले जळगाव जिल्ह्यातील सर्व प्रतिष्ठानचे सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातून स्तरातून त्यांचा अभिनंदन करण्यात येत आहे.

## लोहपुरुष' सरदार पटेल आणि श्रीमती इंदिरा गांधींना महावितरणचे अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**
**नागपूर**

**नागपूर :** स्वतंत्र भारताचे शिल्पकार आणि पहिले गृहमंत्री 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' आणि भारताच्या कणखर माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'राष्ट्रीय संकल्प दिवस' यानिमित्ताने महावितरणतर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले.



**'राष्ट्रीय एकता दिवस') निमित्त महावितरणच्या नागपूर परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी सामूहिक शपथ घेऊन देशाच्या अखंडतेचा संकल्प करताना उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,महावितरण, नागपूर**

महावितरणच्या नागपूर परिमंडलात या दोन्ही महान विभूतींच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले, तसेच देशाच्या अखंडतेची व एकतेची भावना दृढ करण्यासाठी सामूहिक 'राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ' घेण्यात आली. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दोन्ही नेत्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला सलाम केला. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता कायम राखण्याची प्रेरणा देणारी शपथ देण्यात आली.याप्रसंगी अधीक्षक अभियंता संजय वाकडे व मंगेश वैद्य, कार्यकारी अभियंता विजय तिवारी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, आणि वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन) सुशील विखार यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## दागिने चोरीबाबत सविता म्हस्कर यांनी पोलिसांच्या तपासावर केला प्रश्नचिन्ह उपस्थित

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कामोठे येथील गिरीराज सोसायटी, प्रतीक जेम्समध्ये राहणाऱ्या सविता म्हस्कर यांच्याकडील दागिन्यांची चोरी होऊन 40 दिवस उलटून गेले तरी देखील पोलिसांनी आरोपीला पकडले नसल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आला. म्हस्कर कुटुंबीयांनी शेजाऱ्यांनीच दागिने चोरले असल्याचा आरोप 1 नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत केला आहे.



16 सप्टेंबर ते 27 सप्टेंबर दरम्यान अज्ञात इसमाने म्हस्कर यांच्या घरामध्ये प्रवेश करून जवळपास 25 ते 28 लाखांचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 16 सप्टेंबर रोजी यांनी शेजारच्या महिलेला सर्व दागिने दाखवले होते आणि तेच सर्व दागिने चोरीला गेलेले आहेत असे म्हस्कर यांनी सांगितले. यावेळी तपास अधिकारी हे गुन्ह्यातील संशयित आरोपींना पाठीशी घालत असून त्यांच्या वर्तनाचा त्रास होत असल्याचे म्हस्कर कुटुंबीयांनी सांगितले तसेच तपास अधिकाऱ्यांनी संशयित व्यक्तीविरोधात कोणताही तपास केला नसल्याचे म्हस्कर यांचे म्हणणे आहे. त्यामुळे तपासात हलगर्जीपणा करून त्यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. आणि हा गुन्हा गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी केली. या

बाबत कामोठे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोहर पगार यांना विचारले असता या गुन्ह्यासंदर्भात सगळ्या बाजूने तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# सिल्लोड तालुक्यातील 94 तीव्र कुपोषित बालके ग्रामपंचायत अधिकारी संघटना यांनी घेतले दत्तक

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** मा.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी साहेब व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर अंकित साहेब यांच्या आदेशान्वये तसेच मा. गटविकास अधिकारी वर्ग 1,पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली सिल्लोड तालुक्यातील एकूण 94 तीव्र कुपोषित बालकांना ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने दत्तक घेतले. या बालकांच्या घरी दिनांक एक नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी प्रत्यक्ष भेटू देऊन कुपोषित बालकांना दररोज अंडी, केळी, मटकी उसळ, उपमा, गुळ शेंगदाणा लाडू, लापसी, शेवगा शेंगा सूप,सफरचंद,डाळिंब, पपई,बीट



पराठा, पालक पराठा, पोळी भाजी, वरण भात व खिचडी असा विविध प्रकारचा सकस आहार बदलून बदलून दररोज प्रत्यक्ष आपल्यासमोर खाऊ घालून त्यांना कुपोषण मुक्त करण्याची जबाबदारी घेतली. सोबत ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य सेवक,अंगणवाडी ताई हे कर्मचारी स्वतः उपस्थित राहून जो पर्यंत ही 94 कुपोषित बालके कुपोषण मुक्त होत नाही तोपर्यंत त्यांना नियमित आहार देऊन कुपोषणातून मुक्त करणार आहे. त्यामुळे सदर बालके सुदृढ आणि सक्षम करण्याचा संघटनेचा मानस आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त "सरदार १५० एकता पदयात्रा"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

देशाचे पहिले उपपंतप्रधान, लोहपुरुष आणि एकीचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने "सरदार @१५० एकता पदयात्रा" आणि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम जिल्हा संयोजक व जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार यांनी आज (०१) येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांच्यासमवेत सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम जिल्हा सहसंयोजक



सुशिल शर्मा उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत माहिती देताना त्यांनी सांगितले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी 'विकसित भारत २०४७'चा संकल्प घेऊन देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत असून त्या अनुषंगाने वाटचाल सुरु आहे. 'एक भारत, अखंड भारत' या भावनेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांचे व्यक्तिमत्त्व आणि दृढ इच्छाशक्ती युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे. याच भावनेतून राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर "सरदार @१५० एकता पदयात्रा" आयोजित करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संयोजनाखाली विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ही जयंती साजरी करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत उत्तर रायगड प्रशासकीय जिल्हा स्तरावर तीन दिवसीय एकता पदयात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेत दररोज किमान ८ ते १० किलोमीटरचा प्रवास केला जाईल. यात्रेदरम्यान 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या भावनेला बळकटी देण्यासाठी विविध कार्यक्रमे होणार आहेत.

एकता पदयात्रेत एक हजार लोकं सहभागी होतील त्यामध्ये १५० भाजपचे कार्यकर्ते, एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी तसेच विविध संस्था संघटनांचा सहभाग असणार आहे.

या पदयात्रेच्या समारोपात सामाजिक दृष्टिकोनातून पथनाट्य सादर होणार आहे. असे ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले.

काल संपूर्ण देशात एकता दौड मोठ्या उत्साहात संपन्न झाली. विशेषत्वाने पोलीस विभागाने याचे आयोजन केले आणि त्यामध्ये विविध संघटनांनी सहभाग घेतला होता.

"सरदार @१५० एकता पदयात्रा" तीन दिवस असणार आहे त्यामुळे याचे आयोजन चांगल्याप्रकारे व्हावे यासाठी नियोजन केले जात असून ०४ नोव्हेंबरला जिल्हा बैठकीत या पदयात्रेच्या तारखेच्या निश्चिती केल्या जाणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सांगितले.

तसेच या पदयात्रेत नागरिकांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

# श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांची व्यथा; निसर्गाच्या रौद्ररूपाने हातातोंडाशी आलेला घास हिरावला!

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**
**- अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यावर पुन्हा एकदा निसर्गाचा कोप ओढवला आहे. मेहनतीने उभी केलेली शेती, पिकांचा हंगाम जवळ आला असतानाच झालेल्या अवकाळी पावसाने आणि वादळाने उद्ध्वस्त झाली आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

तालुक्यातील अनेक ठिकाणी पिकांचे मोठे नुकसान झाले असून



प्रशासनाकडून पंचनामे पूर्ण झाले आहेत. मात्र, शेतकऱ्यांना फारशी आर्थिक मदत मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीदेखील कोकणातील शेतकरी राजा अजून हरलेला नाही — संकटांना तोंड देत तो पुन्हा नव्या आशेने उभा आहे.

पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, निसर्गचक्रामध्ये सतत होत असलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे अशा नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत आहे. जंगलतोड, प्रदूषण आणि हवामानातील बदल यांचा शेतीवर थेट परिणाम होत आहे. यासोबतच रानटी डुकरांमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत असून, या संदर्भात वनखात्याकडून पंचनामे करण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती लक्षात घेता शासनाने योग्य आणि वेळेवर आर्थिक मदत देणे अत्यावश्यक असल्याचे स्थानिक स्तरावरून मागणी करण्यात येत आहे. अन्यथा उद्याचा शेतकरी राजा आजच्या निराशेत गडप होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेवटी, "शेतकरी टिकला तरच देशाचे पोट भरेल — आणि निसर्ग वाचला तरच भविष्यातील पिढी सुरक्षित राहील" हे सत्य लक्षात ठेवून, निसर्गाशी सुसंवाद ठेवणे आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे हीच काळाची गरज आहे.

# बालहक्क संरक्षणासाठी समित्यांच्या कार्यक्षमतेस वाढ व्हावी-जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम -** बालकांची संरक्षण, त्यांच्या हक्काचे जतन आणि सामाजिक सुरक्षिततेसाठी गाव बाल संरक्षण समित्या प्रभावीपणे कार्यरत रहाव्यात, या उद्देशाने तालुकास्तरीय एकदिवसीय कायदेविषयक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. महिला व बाल विकास विभागांतर्गत आयुक्त, डॉ. नयना गुंडे महिला व बालविकास, पुणे यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, वाशिम तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दि.6 ऑक्टोबर2025 या कालावधीत सहाही तालुक्यांमध्ये हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात बाल न्याय (मुलाची काळजी व संरक्षण) अधिनियम 2005 बाल विवाह प्रतिबंध अधिनियम 2008, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम 2012 तसेच बेटी बचाओ, बेटी पढाओ, अंतोदय योजना, सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना यांसह महिला व



बालकांशी संबंधित विविध कायदे आणि शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. प्रशिक्षण सत्रांना यशदा प्रशिक्षक अश्विनी औताडे, निती आयोगाच्या नीलिमा भोंगाडे, कायदा व परिविक्षा अधिकारी चौधरी तसेच केस वर्कर दिपाली दळवी यांनी मार्गदर्शन केले. सहभागी सदस्यांना प्रशिक्षण साहित्यही वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे, जिला बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले, क्षेत्रीय कार्यकर्ता रामेश्वर वाळवे, एकनाथ राठोड, सामाजिक कार्यकर्ता रमेश वाघ, अनंता इंगळे, चाइल्ड हेल्पलाइन जिल्हा समन्वयक अविनाश सोनुने यांनी पुढाकार घेतला. समारोप प्रसंगी जिल्हा महिलेला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, यांनी गाव बालसंरक्षण समित्यांना सक्रिय राहून गावातील बालकांच्या हक्काचे आणि संरक्षणाचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडण्याचे आवाहन केले.

# श्रीवर्धन शहरातील दांडा विभागातून शिवसेनेला मोठा धक्का!



**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**
**- अनिकेत मोहित**

श्रीवर्धन शहरातील दांडा विभागातून शिवसेना (शिंदे गट) ला मोठा धक्का बसला आहे. दांडा विभागप्रमुख सुरेंद्र तबिब, सिद्धेश चुणेकर, दीपेश चौले, उमेश चोरढेकर आणि त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी आज खासदार सुनीलजी तटकरे, आमदार आदितीताई तटकरे आणि आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक तसेच स्थानिक नेते उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी "विकास आणि जनसेवा हाच आमचा हेतू!" अशी भूमिका मांडत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. लवकरच खासदार आणि आमदार यांच्या उपस्थितीत होणार मोठा जाहीर पक्ष प्रवेश सोहळा! नगर पालिका निवडणुकांच्या तोंडावर हा एक मोठा राजकीय घडामोड असल्याचे मानले जात आहे, ज्यामुळे श्रीवर्धन शहरातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अनुष्का भारत मोरे ला बॉडी बिल्डिंग स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी**

बॉडी बिल्डिंग हा एक क्रीडा प्रकार आहे याला" बॉडी बिल्डिंग" अथवा "शरीर बांधणी" असे म्हणतात. यात मुख्यत्वे शरीराला व्यायाम देऊन शरीराच्या स्नायूंना बळकट केले जाते स्नायूंचा आकार व त्यांची सुडौलता व प्रमाणबद्धता याचे सादरीकरण हे या क्रीडा प्रकाराचे महत्त्व आहे. चौरस आहार हा क्रीडापटूंच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे मग ते बॉडी बिल्डिंग असो किंवा अजून कुठलाही क्रीडा प्रकार आहारावर नियंत्रण ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे .आहार नियंत्रित असेल तर कोणताही आहार घेतला तरी शरीर सौष्ठव बनवू शकता. कठोर मेहनतीच्या जोरावर प्रगती अवलंबून असते जिद्द



आणि चिकाटी डोळ्यासमोर ठेवल्यास मार्गात अडथळा येऊ शकत नाही .कठोर मेहनतीच्या जोरावर सौष्ठवांची प्रगती ही अवलंबून असते शरीर सौष्ठव आणि शिस्त योग्य आहार, वेळ व्यवस्थापन, परिश्रम आणि जिद्द या गुणांचा योग्य वापर केल्यास भविष्यात खेळाडू उत्कृष्ट सौष्ठवपटू खेळाडू बनू शकतो.

अनुष्का भारत मोरे ही डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी ऑफ हॉस्पिटॅलिटी या संस्थेची विद्यार्थिनी डिप्लोमा इन बेकिंगचं शिक्षण घेत आहे. बॉडी बिल्डिंग या खेळात आतापर्यंत तिने अनेक वेळा आपली चमक दाखवली नॅशनल फिजिक कमिटी गोवा येथे २०२३ मध्ये बॉडी बिल्डिंग वुमन्स बिकिनी कॅटेगिरी मध्ये तिने रौप्य पदक पटकावले होते.

अनुष्काला आपल्या कुटुंबातून तिचे वडील भारत मोरे ,आई सुनिता व मोठी बहिण अंजली मोरे हे तिला खेळासाठी नेहमीच प्रोत्साहित करत आहेत. आणि तिला आवड असलेल्या या खेळात ते सहकार्य करत आहेत त्यामुळे ती या खेळात आपले वर्चस्व सिद्ध करत आहे.

अनुष्काची या खेळातील गगन भरारी दिवसेंदिवस प्रगतीपथावर आहे दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी एन.पी. सी. वर्ल्ड वाईड इंडिया बॉडी बिल्डिंग आणि फिजिक चॅम्पियनशिप जयपूर येथे घेण्यात आलेल्या वुमन्स फिट मॉडेल ओपन या स्पर्धा प्रकारात अनुष्का मोरे हिला प्रथम क्रमांक मिळाला आहे आणि ती सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. त्याचप्रमाणे वुमेन्स बिकिनी मध्ये तिला रौप्य पदक मिळाले आहे.

अनुष्का मोरे हिने वुमेन्स फिट मॉडेल ओपन या कॅटेगरीत मिळवलेल्या सुवर्ण पदकाच्या चमकदार कामगिरी बद्दल नगरसेवक बबन मुकादम युथ क्लब कळंबोली यांनी दखल घेऊन त्यांनी अनुष्का चा सत्कार करून तिला शुभेच्छा दिल्या. तिच्या या कौतुकास्पद कामगिरीमुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे व तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याचप्रमाणे तिला भविष्यात पुढे होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा देत आहेत.

# युवा महोत्सव हा तरुणाईतील कलागुणांना प्रोत्साहन देणारा सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा उपक्रम-जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम :** युवा महोत्सव हा तरुणाईतील कलागुणांना प्रोत्साहन देणारा आणि समाज सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा उपक्रम आहे. राज्यात सण 2025-26 या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चालेल ट्रॅक चे आयोजन दि. 10 ते 12 जानेवारी 2026 या कालावधीत करण्यात येणार आहे. समिती यंत्रणांनी समन्वय राखून जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वी करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात दि 29 ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय युवा महोत्सव समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुंभेजकर बोलत होते. यावेळी आढावा



बैठकीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, डॉ. शुभांगी दामले, प्रा. पाटील, प्राचार्य विजय भड, पूजा भाटकर, प्राचार्य बाळासाहेब गोटे, प्राचार्य संजय शिंदे, प्रा . विजय जाधव, श्रीकांत जोशी, प्रा . अक्षय मानवतकर, तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे यांच्यासह विविध शासकीय विभागाचे अधिकारी आणि आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते. या अनुषंगाने राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये राज्याचा संघ पाठविण्यासाठी राज्य, विभाग व जिल्हास्तरीय स्पर्धा घेणे आवश्यक आहे दि .5 नोव्हेंबर2025 रोजी वाटाणे लॉन, वाशिम येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या महोत्सवात सांस्कृतिक आणि नवोपक्रम उपक्रम अंतर्गत विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनृत्य, लोकगीत, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व (मराठी/हिंदी/इंग्रजी) कविता लेखन तसेच नवोपक्रम ट्रॅक (विज्ञान प्रदर्शन) अशा विविध स्पर्धा द्वारे तरुणाने आपले कौशल्य सादर करणार आहे. स्पर्धकांचे वय 15 ते 29 वर्षाच्या दरम्यान असावे. प्रवेश अर्ज विचार 4नोव्हेंबर 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशीम येथे सादर करावेत. अर्जासोबत ओळखपत्र, आधार कार्ड व जन्मतारीख पुरावा जोडणी आवश्यक आहे. मागील तीन वर्षात राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेला स्पर्धकांना यावर्षी संधी दिली जाणार नाही. विजय स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहेत.

ही संधी युवकांना त्यांच्या सूक्त प्रतिभेला वाव देणारे व्यासपीठ ठरणार आहे. बैठकीत महोत्सवाच्या नियोजन, स्पर्धाचे वेळापत्रक, स्थळ निश्चिती, नवोपक्रम ट्रॅक, प्रचार -प्रसार यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला क्रीडा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यार्थी गुणगौरव सोहळा 2025" दिमाखात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रायगड जिल्हा वैश्य समाज संघ शिक्षण समिती व वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने "विद्यार्थी गुणगौरव सोहळा 2025" हा कार्यक्रम उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. यावेळी जवळपास 140 विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख पुरस्कर्ते मनोज महादेव आंग्रे (विश्वस्त, वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड जिल्हा युवक अध्यक्ष) यांनी स्वखर्चाने संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची आणि शिक्षणप्रेमाची ही झलक समाजातील सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.

समाजातील गुणवान विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच शिक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या सोहळ्याचा मुख्य हेतू होता.



"शिक्षण हीच खरी संपत्ती" या विचाराने प्रेरित हा उपक्रम समाजातील पुढील पिढ्यांसाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरला. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षण सभापती महेश पोटे, संतोष चौधरी, वाणी सर, सुनील भोपतराव, तसेच पनवेल तालुका वैश्य समाज महिला अध्यक्षा वर्षा साखरे व त्यांच्या टीमच्या अथक परिश्रमांमुळे यशस्वीरीत्या पार पडले.

यावेळी डॉ. संतोष कामेरकर, अध्यक्ष, वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट, चंद्रकांत खाडये, सहसचिव, डॉ. अजय चौगुले, हृदयरोग तज्ञ, कृष्णा म्हसकर, निरूपणकार, अशोक भोपतराव, अध्यक्ष, रायगड जिल्हा वैश्य समाज, शामल आंग्रे, महिला अध्यक्ष, रायगड जिल्हा वैश्य समाज, मीरा मनोज आंग्रे, उद्योजिका, सुनील शेटे, अध्यक्ष, पनवेल तालुका वैश्य समाज, तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व उपाध्यक्ष, सचिव, गट सभापती आणि असंख्य समाजबांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड जिल्हा वैश्य समाज संघ शिक्षण समिती यांच्या वतीने सर्व उपस्थित मान्यवर, पाहुणे, आयोजक व स्वयंसेवक यांचे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी आणि पालकांनी मनापासून आनंद व्यक्त केला.

# कळंबोली सर्कलशेजारील बस ट्रॅव्हल्सचा थांबा आता कामोठेलगत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

पनवेल जवळील शीव - पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कल (मॅकडॉनल्ड हॉटेलसमोर) येथे उभ्या राहणाऱ्या खासगी आणि राज्य परिवहन महामंडळाच्या बसमुळे निर्माण होणाऱ्या वाहन कोंडीने हैराण प्रवाशांना आता दिलासा मिळणार आहे. मॅकडॉनल्डसमोरील खासगी बस थांबा कामोठे उड्डाण पुलाजवळ के.एल.ई. महाविद्यालयासमोर स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन महिन्यांच्या बैठक सत्रांनंतर हा निर्णय घेण्यात आला असून १ नोव्हेंबर २०२५ पासून नवीन बसथांबा कार्यान्वित होणार आहे. नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी




हा निर्णय घेतला आहे. नवीन बसथांब्याची शिस्त राखण्यासाठी वाहतूक विभाग दोन स्वयंसेवक नेमणार आहेत. मुंबई बस मालक संघटनेलाही यासंबंधी सूचना दिल्या आहेत. बस चालकांनी नवीन ठिकाणीच थांबणे, हॉर्नचा गैरवापर न करणे आणि प्रवासी घेतल्यानंतर तात्काळ पुढे निघणे या अटींचे पालन रावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कळंबोली कॉलनीजवळ पुन्हा बस थांबविल्यास कारवाई केली जाईल. असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व्यवसायवृद्धीसाठी प्रयत्न केले जात असून शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सर्व संलग्न संस्थांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची 67 वी वार्षिक सर्वसाधारण सभा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात झाली. महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम, व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे पाटील, महासंघाचे संचालक, अधिकारी तसेच संलग्नित संस्थांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

दत्तात्रय पानसरे म्हणाले, पीक खरेदीबाबत महासंघामार्फत नियमावली तयार केली जाणार आहे. शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी महासंघाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यात यावे, अशी सूचना करुन महासंघाची नवीन गोदामे बांधणे, मालमत्ता सुरक्षित राखणे आणि त्यात वाढ करणे, संकेतस्थळ वापरामध्ये सुलभता आणणे यासाठी महासंघाने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याचबरोबर हे वर्ष सहकार वर्ष म्हणून घोषित केलेले असल्याने जास्तीत जास्त सहकारी संस्थांना खरेदीचे कामकाज देण्याबाबत पणन महासंघामार्फत राज्य शासनाला विनंती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकामध्ये व्यवस्थापकीय




संचालक डुबे पाटील यांनी महासंघाच्या वर्षभरातील कामाचा आढावा सादर केला. देशात 2202 कोटींची सर्वाधिक सोयाबीन खरेदी महाराष्ट्रात झाली असून याचा लाभ दोन लाख 56 हजार शेतकऱ्यांना झाला असल्याची माहिती त्यांनी दिली. महासंघाची राज्यात 128 ठिकाणी मालमत्ता असून त्यांची क्षमता दोन लाख 80 हजार मे.टन असल्याचे ते म्हणाले. महासंघाने मागील वर्षात 101 कोटींचा निव्वळ नफा मिळविल्याचे त्यांनी सांगितले. महासंघाच्या वतीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 51 लाख रुपयांचा निधी देण्यात आला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

मागील वर्षात राज्य शासन विभागांतर्गत सर्वोत्कृष्ट व्यवहार करणाऱ्या संस्था, नाफेड खरेदी विभागांतर्गत सर्वोत्कृष्ट व्यवहार करणाऱ्या संस्था, रासायनिक / भगीरथ खत सर्वोत्कृष्ट व्यवहार करणाऱ्या संस्था त्याचप्रमाणे 2024-25 मध्ये उत्कृष्ट कामकाज करणारे पणन महासंघाचे अधिकारी / कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**महासंघाविषयी :** पणन महासंघ ही महाराष्ट्रातील खरेदी-विक्री व पणन संस्थांची शिखर संस्था असून राज्यातील 827 'अ' वर्ग संस्था पणन महासंघाच्या सभासद आहेत. संस्थेने आजवरच्या काळात शेती व शेतकरी आणि ग्राहक यांच्या विकासासाठी आणि हितसंरक्षणासाठी अभिमानास्पद कामगिरी केलेली आहे. पणन महासंघाने शासनाच्या विविध योजना यशस्वीपणे राबविल्या असून शासनाने पणन महासंघावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविला आहे. अहवाल सालामध्ये धान व भरडधान्य, कडधान्य व तेलबिया खरेदी, खत व पशुखाद्य विक्रीचे उल्लेखनीय काम केलेले आहे. शेतीमालाला लाभदायक व वाजवी भाव मिळावा यासाठी विविध भरडधान्य व तेलबिया / कडधान्ये यांची केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दराने राज्यात खरेदी केलेली आहे.

नाफेड, एनसीसीएफ व महाराष्ट्र शासनाकरिता पणन महासंघामार्फत कडधान्य (तूर, उडीद, मुग, चना) व तेलबिया (सोयाबीनची) खरेदी झालेली आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान व भरडधान्य (मका, ज्वारी व रागी) खरेदी मोठ्या प्रमाणात झाली आहे.

रासायनिक व भगीरथ खत विभाग – पणन महासंघाने राज्यामध्ये सर्व जिल्ह्यात शेतकऱ्यांना विविध कंपन्यांचे खत पुरवठा करण्याचे काम यशस्वीरित्या पार पाडले आहे.

# पनवेल महानगरपालिका दक्षता जनजागृती सप्ताह; पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

केंद्रीय दक्षता आयोग, तसेच राज्य शासनाच्या सूचनेनुसार दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जात आहे. या अंतर्गत महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बोलताना पोलिस अधिक्षक शिवराज पाटील म्हणाले, कोणत्याही प्रलोभनांना न भुलून जाता




शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधानाने, प्रामाणिकपणे व सचोटीने काम करावे. तसेच अधिकारी, कर्मचारी व नागरिकांमध्ये भ्रष्ट्राचाराबाबत जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट करताना त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याची माहिती सांगितली. यावेळी आपल्या प्रास्ताविकामध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी शासकीय सेवेत काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व नियमांचे पालन करत काम सचोटीने,निस्पृह काम करायला हवे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मानले. यावेळी मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे तसेच लाचलुचपत प्रतिबंध विभागचे अप्पर पोलिस निरीक्षक भागवत सोनावणे, पोलिस उप अधिक्षक धर्मा सोनके उपस्थित होते. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल तालुका पोलिसांतर्फे सायबर सुरक्षा जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

30 ऑक्टोबर रोजी पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील बालाजी रेसिडेन्सी, हेदुटणे तालुका पनवेल येथील रहिवासी व परिसरातील रहिवासी यांची सायबर सुरक्षा/ जनजागृती संदर्भात मीटिंग आयोजित करून सायबर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सायबर गुन्हेगारी व सायबर सुरक्षा बाबतचे मानवी साखळीद्वारे जनजागृती करून प्रशिक्षण देण्यात आले.

यामध्ये मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, फेक लिंक, इंस्टाग्राम फेसबुक फ्रॉड, मालवेअर, फोन पे,





गुगल पे फ्रॉड, ऑनलाइन ट्रेडिंग फ्रॉड, डिजिटल अरेस्ट फ्रॉड, एनसीसीआरपी पोर्टल, व हेल्पलाइन क्रमांक 1930 बाबत माहिती देण्यात आली. तसेच नवी मुंबईचे व्हाट्सअप व इंस्टाग्राम पेजची माहिती देण्यात आली.

# अडीच लाख आणि रेशनसाठी आईनेच विकले !



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

वाहतुक प्रतिबंधक कक्ष व तळोजा पोलिसांनी पीडित मुलीच्या आईकडे चौकशी केली असता, त्यांनाही धक्का बसला. पीडित मुलीच्या आईने आरोपी फारुक शेख याच्याकडुन घर भाड्याने घेण्यासाठी अडीच लाख रुपये घेतले होते, त्याचप्रमाणे दर महिन्याचे रेशन धान्य देखील फारुककडून मिळणाऱ्या रकमेतूनच ती खरेदी करत होती. या पैशांसाठी ती आपल्या १० वर्षाच्या मुलीला वारंवार फारुकच्या घरी पाठवत असल्याचे तपासात उपड झाले आहे. आपल्या मुलीवर ७० वर्षाच्या व्यकीकडून लैंगिक अत्याचार होत असल्याची माहिती असूनही केवळ पैशांच्या मोहापायी निर्दयी आईने हे घृणास्पद कृत्य सुरु ठेवल्याचे तिच्या चौकशीत उघड झाले आहे. पैशांची लालसा आणि मायेची किंमत न करणाऱ्या जन्मदात्रीच्या या कृत्याने पोलीस अधिकारीही स्तब्ध झाले आहेत. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात बलात्कारासह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपी फारुक अल्लाउद्दीन शेख आणि त्याला साथ देणारी पीडित मुलीची जन्मदात्री आई या दोघांनाही पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तळोजा परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या आरोपीच्या फ्लॅटच्या तपासणीत दारुची बॉटल, सेक्स पॉवरच्या गोळ्यांची पाकिटे, सेक्स टॉय, व्हॉब्रेटर, पॉसलीन, डिजीटल हीडीओ रेकॉर्डर, डिव्हीआर अशा अनेक संशयास्पद बस्तु आहळुन आल्या असून पोलिसांनी या सर्व वस्तू जप्त केल्या आहेत.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झिजणारे कलावंत शिक्षक प्रदीप कुडमते यांचं कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी - गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

**किनवट :** एक चाणाक्ष , विद्यार्थीप्रिय , कवी , कलावंत शिक्षक प्रदीप देवराव कुडमते यांनी आपलं संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झिजवलं ; हे त्यांचं कार्य सर्व शिक्षकवृंदांसाठी प्रेरणादायी आहे. असे प्रतिपादन गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने यांनी केले.

येथून जवळच असलेल्या घोटी येथील शिवाजीराजे मंगलकार्यालयात जि.प.प्रा.शाळा झेंडीगुडा लोणी येथील सह शिक्षक प्रदीप देवराव कुडमते यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचा अध्यक्षीय समारोप करतांना ते बोलत होते. यावेळी भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे , नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख , जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे , माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनवार , पंचायत समिती माजी सभापती प्रतिनिधी दत्ता आडे , सरपंच निर्मला मेश्राम , माजी सरपंच प्रकाश गेडाम , उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे , केंद्रिय मुख्याध्यापक शरद कुरुंदकर , शिवाजी बरबडकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर उपस्थिती होती.

गणेश येरकाडे यांनी सूत्रसंचालन केले व स्वागत




**आमदार भीमराव केराम यांचे गौरोद्‌गार**
माझ्या नात्यातील प्रदीप कुडमते हे अत्यंत चांगले शिक्षक असून त्यांचे अनेक विद्यार्थी सैन्यासह विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. आज आमच्या वरिष्ठ नेत्यांसमवेत व्यस्त कार्यक्रम असतांना केवळ सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सन्मान करण्यासाठी आम्ही येथे वेळातला वेळ काढून आलोत. जय जंगो रायताड त्यांना सुदृढ आयुष्य देवो, त्यांना दीर्घायुरोग्य लाभो ! अशी मी मनोकामना करतो , असे गौरोद्‌गार आमदार भीमराव केराम यांनी याप्रसंगी काढले.

गीत गाईले. अनिल गुंजकर यांनी प्रास्ताविक केले. विजय पेंदोर यांनी आभार मानले. याप्रसंगी गोपाल गेडाम , राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त निवृत्त केंद्र प्रमुख रामा उईके , दीपक राणे , केंद्रप्रमुख विजय मडावी , उत्तम कानिंदे , गोपाल कनाके , किशन धुर्वे या प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर प्रदीप देवराव कुडमते व यमुना प्रदीप कुडमते यांना सेवानिवृत्ती निमित्त पुष्पगुच्छ , महावस्त्र व सन्मानपत्र देऊन आमदार भीमराव केराम यांचे हस्ते गौरविण्यात आले. त्यानंतर कमठाला केंद्रातील सर्व शिक्षकांच्या वतीने गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने यांचे हस्ते त्यांना भेटवस्तू प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते विकास कुडमते , अरुण कुमरे , लक्ष्मण कनाके आदीं मान्यवरांसह बहुसंख्येने शिक्षक , कर्मचारी व त्यांचे नातलग उपस्थित होते.

# के. जी. एस. शुगरमुळे शेतकऱ्यांच्या घरात पुन्हा दिवाळी !!

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**
**महेश साळुंके/लासलगाव**

चालू हंगामातील अतीवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लगत असतांना केजीएस शुगर कारखान्याच्या वतीने गुरुवार दि. ३० ऑक्टोंबर, २०२५ रोजी कारखाना कार्यस्थळावर २३६ शेतकयांना एक कोटी अड्डुसष्ट लाख रुपयांचे मागील थकीत पेमेंट तसेच पिंपळगाव निपाणी ग्राम पंचायतीची भागील थकीत पट्टी तेहतीस लाख अठरा हजार रुपये, तलाठी कार्याल्याचा थकीत कर सहा लाख रुपये तसेच काही कामगारांचे मागील थकीत पेमेंट सात लाख रूपये असे अकूण दोन कोटी पंधरा लाख रुपये अदा करण्याचा कार्यक्रम संचालिका *सौ. सोनियाताई होळकर* व संचालक *श्री. प्रकाशशेठ दायमा* यांच्या हस्ते पार पडला. यामुळे परीसरातील उस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.के.जी. एस.शुगर कारखाना लासलगांव येथील उद्योजक वेफकोचे चेअरमन *श्री. संजय चांगदेवराव होळकर* यांनी विकत घेतला आहे. कारखान्याच्या बंद काळातील 'बी' फॉर्म भरलेल्या



उर्वरीत ऊस उत्पादकांची थकीत रक्कम पुढील सप्ताहापासून टप्या-टप्याने वितरीत करण्याचे काम कारखाना कार्यस्थळावर होणार आहे. संबंधीत थकीत ऊस उत्पादकांना लवकरच तशा आशयाचे संदेश मोबाईल द्वारे प्राप्त होतील.


जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार थकीत ऊस उत्पादकांनी आपली थकीत रक्कम घेऊन जावी, अशी सूचना संचालिका सौ. सोनियाताई होळकर यांनी शेतकयांना केली आहे.

या कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी प्रभाकर रायते, रामदास शिंदे, जनरल मॅनेजर सुखदेव शेटे, शेतकी अधिकारी पटेल सो. व देसले सो., गट सुपरवायझर श्री. लक्ष्मण निकम तसेच लालजी गडाख, पोपटराव काळे, सकारी सानप, किरण चकोर, संजय बाजारे, ऋषिकेश सोनवणे, दत्तात्रय बोराडे, ऋषिकेश कुंदे, शरद बोडके व कार्यक्षेत्रातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारखान्याचा चालू हंगाम लवकरच सुरु होणार असून कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीत जास्त भाव व एकरकमी पेमेंट कारखाना देणार असल्यामुळे परीसरातील ऊस उत्पादकांनी कुठलीही घाई न करता, याच कारखान्यास ऊसपुरवठा करावा, तसेच पुढिल हंगामासाठी जास्तीत जास्त ऊसाची लागवड करावी, असे आवाहन संचालिका सौ. सोनियाताई होळकर यांनी केली आहे.

# नाभिकाने केला ग्राहकावर वस्ताऱ्याने गंभीर वार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

पैशाच्या वादातून नाभिकाने एका ग्राहकावर वस्ताऱ्याने गंभीर वार केल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली आहे . नवीन पनवेल येथील मंगलमूर्ती मार्केट या ठिकाणी असलेल्या दीपक हेअर कटिंग सलून येथे रवींद्र कल्लाप्पा वाघमारे (वय ३५ वर्षे धंदा ड्रायव्हर) हा केस कटिंग करण्यासाठी गेला असता येथील कामगार सीठा रघुवीर सिंग (वय २९ वर्ष राहणार देवद )






याच्याकडे फिर्यादी रवींद्र वाघमारे केस कापण्यासाठी गेला असता सिठा रघुवीर सिंग याने 'आदी प्रथम पैसे दे मग तुझे केस कापतो' असे बोलले असता त्या कारणावरून फिर्यादी रविंद्र व आरोपी सिठा सिंग वाद होऊन त्यातील आरोपी याने त्याच्या हातातील दाढी करण्याच्या वस्त्याने फिर्यादी याच्या उजव्या डोळ्याच्या खालील बाजूपासून उजव्या गालावर ओठापर्यंत वार करून गंभीर दुखापत केली. रवींद्र वाघमारे याला एमजीएम हॉस्पिटल येथे उपचारासाठी ठेवले असून सदर प्रकरणाचा तपास खदिश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय परशकर करत आहेत.या घटने आरोपी सिठा सिंग याला अटक केली असून दीपक हेअर कटिंग सलून मंगलमूर्ती मार्केट नवीन पनवेल हे दुकान तपासासाठी सेल केले आहे या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय पारसकर करत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# संत येती घरा तोचि दिवाळी दसरा

## हनुमान मंदिर अर्जुन नगर परिसर अमरावती येथील काकड आरतीचा व दिंडीचा प्रारंभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख** दिनांक 7/10/2025 पासुन ते 5/10/2025 कार्तिक पोर्णिमे पर्यंत सालाबादाप्रमाणे सुरू झाला आहे.



**प्रदक्षिणेचा रूट**

हनुमान मंदिरा पासुन रेणुका माता मंदिर अप्पर वर्धा सोसायटी मार्ग, श्री हरि नगर महादेव मंदिर तेथून गणपती मंदिर, नंतर विठ्ठल रूख्मिनी मंदिर त्यानंतर श्री संत गजानन महाराज मंदिर ते परत हनुमान मंदिर....... पर्यंत

हा दर दिवशी चा काकडा आरती दिंडीचा रूट मार्ग आहे.

सुर्योदया पुर्वी चे सकाळ चे आरोग्य वर्धक आल्हाददायक निर्मळ वातावरणात उठा उठा हो सकळ जण उठिले नारायण*** हा गजर करीत एक एक पाऊल पुढे टाकत टाकत दिंडीकराचे स्वागत मार्गात

येणाऱ्या आवड असणाऱ्या प्रत्येक घरासमोरील पाणी टाकुन रांगोळी व अक्षयणाव्दारे झेंडेकरी, पुजारी व विणेकरी महाराजांच्या चरण पुजन व औक्षवण करून केल्या जाते.

ही परंपरा टिकून ठेवण्यात परिसरातील आध्यात्मिक गोडी जपणारे निवडक घरातील कुटुंबातील सदस्य जपवणूक करतात. ही बाब महत्वाची दिसून येते. पुढील पिढीला योग्य संस्कार देण्यात चांगलीच आहे. हा नित्यक्रम दरदिवशी असतो. हा एक वेगळा आनंद असतो .

विषेशता एक बाब अशी की,परिसरात अनेक कुटुंबे वास्तव्यास आहेत. त्यातील अत्यंत आवडीने दिंडीकराचे स्वागत करण्यासाठी कोजागिरी पौर्णिमाच्या दुसऱ्या दिवशी पासुन काकड आरती दिंडीकराचा पहिल्या दिवशी एवढ्या सकाळी कोजागिरी पौर्णिमा चा दुधाचा प्रसाद अगदी सर्वांना आदरातिथ्य घडविण्याचा प्रयत्न सर्वात मन तृप्त करणारा राहला. आदरणीय श्रीमान श्री यादव साहेब व सौ यादव ताईसाहेब ह्या सकाळी सकाळी उठून दोघेही उभयतांना ईतका उत्साह असतो की सर्वोना हेवा वाटावा व विचार करायला भाग पाडायला लावणारा. दरदिवशी न थकता दिंडीकराचे स्वागत व औक्षवण आग्रहाची चहा बिस्किटे कधी नास्ता तर कधी चामुंडा देवी यज्ञ निमित्ताने प्रत्येक काकड आरतीतील भक्तगणांना निमंत्रित करून आग्रह कारक भोजन दिले. तेही वैयक्तिक उभयतांनी लक्ष देऊन एवढा स्नेंह कुठेही मिळणे अशक्य आहे. धन्य आहे या परिवारचे.

मनाचा मोठेपणा निर्मळ मण आणि लिनता.....व उत्साह याही वयात या उभयतांना या करीता यादव कुटुंबास मानाचा मुजरा आहे

**संत येती घरा तोची दिवाळी दसरा**

**अतिथी देवो भव**

मनापासून एवढया उत्साहाने दरदिवशी ह्या माय माऊली ताईसाहेब व यादव साहेब यांचे मानावे तेवढे आभार मानले तरीही कमी पडेल.

कारण एक दिवस कुणीही ही दिंडीकराचे स्वागत व आदरातिथ्य घडविण्याचा प्रयत्न करतात. पण ईथे दररोज होतो. यां बाबत अभिमान वाटतो.तेव्हा मी सर्वाच्या वतिने शब्द सुमनाने त्यांचे स्वागत व अभिनंदन करू इच्छितो. आपणा गृप सदस्याचे वतिने आपली परवाणगी समजून .

आपला आभारी व ऋणी राहील .आणखीन एक म्हणजे काकडा आरती दिंडीत व हरिपाठातही मलाही सहभागी करून घेतले.

आपल्या सहवासाने विठ्ठलची सेवा करण्याची व हा दरदिवशी चा आनंद सोहळा घेण्याची संधी मलाही दिली . तसेच वडीलाचा वारसा जपण्यासाठी प्रवृत्त केले. या बाबतीत आदरणीय बेलोरकर दादा , ईगंळे पुजारी दादा, तसेच विठ्ठलराव पवार दादा , कोठे गुरूवर्य यांचेही आभार मानतो.

# आ.धस साहेब अंभोरा साखर कारखाना आणला त्यांचे काय झाले

## निवडणुकीत हरलो तरी शेतकऱ्यांसाठी काम करतच राहणार - माजी आ.भीमराव धोंडे

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

महेश सहकारी साखर कारखाना विक्रीला निघाला होता.शेतकऱ्यांचा कारखाना होता.म्हणून आपण तो घेतला नाही. जुन्या नेत्यांनी खुप कष्टाने हा सहकारी साखर कारखाना उभा केला होता. ज्यांनी काढला ते आता नाहीत. आपण निवडणुकीत तो कारखाना जिंकला ऊस क्षेत्र वाढले आहे. इतर पिके परवडत नाही.त्यामुळे ऊस महत्वाची आहे. परवाना काढण्यासाठी खुप प्रयत्न केले मुख्यमंत्री व इतरांना भेटलो आहे. आपण मतदार संघात शैक्षणिक विकास केला. खाजगी कारखान्यासाठी हा बंद पाडू नका. मला बोलावुन घ्या.. आपण दिल्लीला जाऊ,आ. सुरेश धस साहेब आपण अंभोरा येथे साखर कारखाना आणला त्यांचे काय केले? निवडणुकीत हरलो तरी शेतकऱ्यांसाठी काम करातच राहणार आहोत.आ. सुरेशराव धस साहेब अंभोरा साखर कारखाना आणला त्यांचे काय झाले ? निवडणुकीत हरलो तरी शेतकऱ्यांसाठी काम करतच राहणार ..१५ दिवसात महेशला लायसन्स मिळाले नाही तर साखर संघाच्या कार्यालया समोर तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांचे नेते माजी आ.भीमराव धोंडे यांनी दिला.

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अयोजीत धरणे आंदोलन प्रसंगी ते बोलत होते.

प्रारंभी जिल्हाधिकारी कार्यालयापासून चालत जात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

माजी आ.भीमराव धोंडे यावेळी म्हणाले की, महेशच्या लायसन्ससाठी १५ दिवसांत तिव्र आंदोलन करु आंदोलना शिवाय सरकार वठणीवर येत नाही.लोकांसाठी जो काम करतो.कारखाना जपण्यासाठी प्रयत्न करा.जेष्ठ लोकांचे मोठे योगदान आहे. आम्ही परवाना मिळवूनच घेऊ.परवाना रद्द करताना आम्हाला नोटीस आली नाही.आ.सुरेश धस आपण मुख्यमंत्री फडणवीसकडे आम्हांला घेऊन चला.. हे सार्वजनिक काम आहे. लोकांचा कारखाना आहे. ऊसतोड कामगार महामंडळ यांनी मजुरांवर होणारा अन्याय दुर करण्यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. आता मिडियाने बीडची बदनामी थांबवावी. राज्यात सर्वत्र घटना घडतात. यावेळी सरपंच दादा जगताप, कॉ.महादेव नागरगोजे,ॲड. संभाजी दहातोंडे,शिवाजी नाकाडे,राजपाल शेंडगे,अशोक साळवे,माऊली पानसंबळ, सुरेश राख,दादासाहेब मुंडे, सुदाम झिंजुर्के,राम खाडे, नियामत



बेग,डॉ.अजयदादा धोंडे,ॲड. भाऊसाहेब लटपटे, उपसभापती देविदास शेंडगे,

पांडुरंग नागरगोजे,रामराव खेडकर यांची भाषणे झाली.

यावेळी ॲड.हनुमंत थोरवे, संतोष जाधव,बाळासाहेब पवार,राम खाडे,भाऊसाहेब लटपटे,अजय धोंडे,अभय धोंडे,नियामत बेग,राजाबापु नलावडे,रामराव खेडकर, अशोक साळवे,डॉ.पंढरीनाथ गोरे,बाजीराव हजारे,दादासाहेब मुंडे,राजेंद्र धोंडे,किशोर खोले, दिलीप म्हस्के,विजय कोठारी, अंकुश मुंढे,मधुकर ढाकणे, संतोषभैय्या चव्हाण,सौ.इंदुबाई गोल्हार,सुरेश राख,सतीषमामा झगडे,सरपंच सावता ससाणे, युवराज खटके,आदिनाथ गवळी,छगन तरटे,माऊली पानसंबळ,महारुद्र खेडकर, हरिभाऊ बेलेकर,पांडुरंग नागरगोजे,संभाजी जगताप, विष्णु खेडकर,बाबासाहेब अंधाळे,गौतम सावंत, बाळासाहेब शिंदे,उत्तम बोडखे, अभय गर्जे,सदाशिव दिंडे,एन. एम.बडे,बबन औटे,सरपंच भरत जाधव,सुदाम झिंजुर्के, पांडुरंग गावडे,हरिभाऊ जंजीरे,अस्लम बेग,दिलीपराव काळे,महादेव दानवे,शिवाजी वनवे,सुधीर जगताप,जगन्नाथ ढोबळे, बबन नन्नवरे,शेख अन्सारभाई,ॲड.अश्रफ सय्यद, अस्ताकभाई शेख,राजाराम नन्नवरे,बबन आणेराव,रघुनाथ शिंदे,आप्पासाहेब राऊत, मधुकर शिरोळे,राम गाडे, सरपंच सोमनाथ गायकवाड, नंदकुमार फसले,बाबा घुले,सुधीर ढोबळे, दादासाहेब हजारे,सदाशिव तुपे,कुंडलीक आस्वर,दिपक बोराडे, तुकाराम मांडवेकर,माजी सभापती लांबरुड,शहादेव खेडकर, बाळासाहेब वाघुले,नानाभाऊ वाडेकर,आबासाहेब राऊत, बाबा ससाणे,अस्लम बेग, बाजीराव हजारे,बबनराव सांगळे,बजरंग कर्डीले, चेअरमन शाम सांगळे,सरपंच माऊली वाघ, सरपंच संजय विधाते,सुदाम झिंजुर्के, तुकाराम चव्हाण,राधाकिसन सिरसाट आदि मान्यवर उपस्थित होते.

अहिल्यानगर येथील बी.आर. इव्हेंट प्रस्तुत राजा शिवछत्रपती शाहिरी कलावंत शेवगान अक्षय डांगरे आणि सहकारी यांनी शेतकरी गीते सादर केली. यावेळी राम खाडे यांनी सांगितले की,सहकार क्षेत्रातील कारखान्याचा परवाना रद्द करण्याची ही राज्यातील पहिलीच वेळ आहे.ॲड. भाऊसाहेब लटपटे यांनी आ.सुरेश धस यांच्यावर जोरदार टिका केली.डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की,सामान्य लोकांसाठी आम्ही काम करतो, खरी ताकद सामान्य माणसात आहे.आम्ही लोकांच्या कामात आहोत. महेश (कडा) साखर कारखाना तालुक्यातील वैभव आहे. त्यांचे पुनर्वसन करायचे आहे.आता लायसन्स दिले नाही तर पुणे येथे साखर आयुक्तासमोर भव्य आंदोलन करूया.पाटोदा मार्केट कमिटीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की, परवाना रद्द करणे ही खुप मोठी घटना आहे. राजकारणात खुन्नस चांगले नाही.आमदार असताना भीमराव धोंडे यांनी मतदार संघांत डांबरी रस्ते केले. रामराव खेडकर यांनी सांगितले की, मतदार संघात ९ लाख टन ऊस आहे. महेश साखर कारखाना भीमराव धोंडे यांचा नाही. शेतकऱ्यांचा आहे.यांचे भान शासनाने ठेवावे. यावेळी मिरजगाव,जामखेड, परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचल प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमगर तर आभार संतोष लक्ष्मणतात्या जाधव याश यांनी मानले

## राजकुंवर महाविद्यालय पिंपळा येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर राजकुंवर पिंपळा महाविद्यालयामध्ये मोठ्या उत्साहात भारताचे पहिले गृहमंत्री तथा 'लोहपुरुष' म्हणून परिचित असलेले सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन प्रा.राहुल राजपूत यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.राहुल राजपूत हे होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा.नरेश कोळी,

प्रा बाळू जोशी शुभम मेहेर किशोर राठोड अविनाश राजपूत अनिल वाघ इत्यादींची उपस्थिती होती.

## बेताल बादशाह सारखं वर्तन कृषी पर्यवेक्षकाचे ठिबक प्रकरणावरून शेतकऱ्यांना दम संतापाचा स्फोट..... त्या कृषी पर्यवेक्षकाची तात्काळ हाकल्पट्टी करा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** तालुक्यातील कृषी विभागातील एका विनायक सपकाळ नावाच्या कृषी पर्यवेक्षकाने बेताल बादशाह सारखे वर्तन सुरू असल्याची चर्चा सध्या चांगलीच रंगली आहे. ठिबक तपासणीसाठी एका शेतकऱ्याने कृषी पर्यवेक्षक विनायक सपकाळ यांना फोन करून विनंती केली असता, त्यांनी सध्या गारा आहेत, मी येत नाही. मला जेव्हा वाटेल तेव्हा येईन. तुमच्यासाठी का गाऱ्यात यायचं का? असा उद्धट सवाल करून मला विचारल्याशिवाय तुम्ही दुसऱ्या दुकानातून ठिबक कसे घेतले? अशा बेताल भाषेत शेतकऱ्याला दम दिला असल्याचे आरोप शेतकऱ्यांनी केले आहेत.

अगोदरच शेतकरी अतिवृष्टीमुळे हवालदिल झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास मातीमोल झाला आहे, कर्ज काढून कसाबसा ठिबक संच घेतलेले आहेत. अशा परिस्थितीत तपासणीसाठी फोन केल्यावर शेतकऱ्यांना उलट अधिकारीच दम देतात, ही गोष्ट शेतकरी वर्गाच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ठिबक संच तपासणीसाठी वेळेवर अधिकारी येत नाहीत आणि वरतून शेतकऱ्यांना कोणत्या दुकानातून घेतलात? असा हिशेब विचारत दादागिरी दाखवतात. शासन योजनांद्वारे शेतकऱ्यांना मदत व्हावी हा हेतू असताना, काही अधिकारी स्वतःच्या मनमानीने शेतकऱ्यांना त्रास देत असेल तर त्यांना आम्ही चांगला धडा शिकवू अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष राहुलकुमार ताठे यांनी केली आहे.

या घटनेबाबत संतप्त शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित सपकाळ पर्यवेक्षकाची तात्काळ बदली आणि चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळणाऱ्या अशा अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर कृषी विभागावरील विश्वास डळमळेल, असा इशारा शेतकरी संघटनेचे प्रसाद वराडे यांनी दिला आहे.

## पाल्यांच्या शिक्षणाकडे प्राधान्याने लक्ष देण्याची देणे आवश्यक - तहसीलदार घोळवे

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

पालकांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे प्राधान्याने लक्ष देण्याची देणे आवश्यकता असल्याचे मत शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी व्यक्त केले. तहसील कार्यालयामध्ये आधार कार्ड वरील नाव दुरुस्तीच्या अनुषंगाने अनेक विद्यार्थ्यांचा दररोज संबंध येत असतो. त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता, दहा पैकी आठ विद्यार्थ्यांना ते ज्या वर्गात शिकत आहेत, त्या वर्गातील मूलभूत संकल्पना माहीत नाहीत. असेही ते म्हणाले.

बारावी सायन्सला असलेल्या विद्यार्थ्यांना आवडीचा विषय विचारला असता ते मराठी विषय सांगतात. दहावीच्या विद्यार्थ्यांना गणितातील सूत्रे, विज्ञानातील अणु-रेणू, मराठी व्याकरणातील शब्दांच्या जाती, भूगोलातील वातावरणाचे थर, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील काही प्रसंग याविषयी विचारले असता त्यांना काहीच माहीत नसते. अनेकदा पालक सोबत असतात पालकांना देखील त्याचे काही वाटत नाही. काही मुले जिल्हा परिषद शाळेच्या ऐवजी खाजगी शाळेत ५०हजार ते एक लाख फीस भरून शिकत असल्याचेही दिसून येते. एवढी फीस भरूनही त्या मुलांना देखील साध्या साध्या प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत, अशी परिस्थिती दिसत असते. अलीकडच्या काळामध्ये कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर अभ्यास किंवा कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. केवळ शालेय व महाविद्यालयातील गुणांच्या आधारावर आपली कुठेही निवड होणार नाही हे विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या विचारात घेता वैद्यकीय क्षेत्र, इंजिनिअरिंग, विविध स्पर्धा परीक्षा, एमपीएससी यूपीएससी या सर्व ठिकाणी परीक्षेच्या विविध टप्प्यातून पुढे जावे लागते. अशावेळी खरा अभ्यास असल्याशिवाय विद्यार्थ्यांचा निभाव लागत नाही. म्हणून विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून शास्त्रशुद्ध अभ्यासाची सवय असणे आवश्यक आहे व आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे आणि प्रत्येक परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात देण्याची सवय आतापासून लागावी यासाठी पालकांनी जागरूकपणे लक्ष देण्याची गरज आहे. असे विचारही त्यांनी व्यक्त केले.

# लासलगाव बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**महेश साळुंके/लासलगाव**

**लासलगांव :-** लासलगांव बाजार समिती म्हणजे केवळ संस्था नाही, तर शेतकरी बांधव, अडते, व्यापारी, माथाडी / मापारी कामगार, कर्मचारी व इतर सर्व मार्केट घटक मिळुन एक मोठं कुटूंब आहे. त्यामुळे बाजार समितीचा सभापती म्हणुन नव्हे, तर या कुटूंबाचा प्रमुख म्हणुन आपणास जास्तीत जास्त मुलभूत सुविधा पुरविणेसाठी कटीबध्द असल्याचे प्रतिपादन बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप यांनी केले. ते बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.

आशिया खंडात एक विश्वासार्थ खुली बाजारपेठ म्हणुन नांवलौकीक लाभलेल्या लासलगांव बाजार समितीची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०१ रोजी शनिवारी प. पू. भगरीबाबा मंदीराचे सभा मंडपात आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप होते. सुरूवातीस प. पू. भगरीबाबांच्या मुर्तीस व श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून बाबांची आरती करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यात आली.

प्रास्तविक व सुत्रसंचालन सुनिल डचके यांनी केले. मागील सभेचे इतिवृत्त, आर्थिक पत्रके, लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक अहवालाचे वाचन सदस्य सचिव नरेंद्र वाढवणे यांनी केले. यावेळी उपस्थित प्रतिनिधींपैकी हरीश्चंद्र भवर, शिवा सुरासे, जनार्दन जगताप, सोमनाथ पानगव्हाणे, विकास रायते, धनंजय डुंबरे, प्रदीप तिपायले, पांडुरंग शेलार, पतिंगराव ढोमसे, संदीप गारे, केदु शिंदे, नवनाथ शिंदे, सुनिल शिंदे, रामनाथ शेजवळ, गोपीनाथ ठुबे, तुकाराम गांगुर्डे, रामकृष्ण दराडे, गोकुळ पाटील, रामदास वावधाने, भाऊसाहेब गांगुर्डे, निवृत्ती कोल्हे, उत्तम जगताप यांनी बाजार समितीच्या दैनंदीन




कामकाजाविषयी वेगवेगळया सुचना मांडल्या.

यावेळी उपस्थित प्रतिनिधींनी मांडलेल्या सुचनांवर सभेचे अध्यक्ष तथा बाजार समितीचे सभापती जगताप यांनी सांगितले की, लासलगांव बाजार समितीची स्थापना ०१ एप्रिल, १९४७ रोजी झालेली असुन आज ७८ व्या वर्षांची प्रदीर्घ वाटचाल पुर्ण करीत आहे. स्थापनेपासुन आजपर्यंत बाजार समितीने शेतकरी हा केंद्र बिंदु मानून नेहमी शेतकरी हित जोपासण्याचे काम केले असुन असंख्य विकास प्रकल्प, शेतकरी हिताचे निर्णय, बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता आणि कामगार, व्यापाऱ्यांचा सुसंवाद यामुळे लासलगांव बाजार समितीची आशिया खंडात कांदा ह्या शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसाठी विशेष ओळख निर्माण झालेली आहे. शेतकरी हा आपल्या देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या श्रमाचे योग्य मुल्यमापन व्हावे, त्याला योग्य दर मिळावा यासाठीच बाजार समितीची निर्मिती झाले आहे म्हणनुच आम्ही शेतकरी हिताला नेहमी प्राधान्य देत निर्णय घेतो.

अहवाल वर्षात बाजार समितीने राज्याच्या मंत्री महोदयांच्या सहकार्याने मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील ०८ हे. ६१.५६ आर जागा शासकीय दराने संपादित केली आहे, शेतकरी, व्यापारी व इतर मार्केट घटकांच्या सोईसाठी सुमारे ११.४० कोटी रूपयांची विविध विकास कामे पुर्ण केली आहे, मानोरी खुर्द येथे परीसरातील शेतकरी बांधवांच्या शेतीमाल विक्रीच्या सोईसाठी खरेदी-विक्री केंद्राची स्थापना करून सदर केंद्रावर भुसार, तेलबिया व द्राक्षेमणी ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू केलेले आहे, तसेच निफाड उपबाजार आवारावर फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू केले आहे. त्याचप्रमाणे कांदा बाजारभावाबाबत ज्या-ज्या वेळी शेतकरी बांधवांकडुन आंदोलनं होतात, त्या-त्यावेळी कांद्याच्या बाजारभावासंदर्भात बाजार समितीच्या वतीने केंद्र व राज्य शासनाच्या मंत्री महोदयांकडे निवेदन देऊन पाठपुरावा करण्यात येतो.

खानगांव नजिक तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रासाठी खडक माळेगांव / खानगांव नजिक ग्रुप ग्रामपंचायतीने दिलेली ०३ हे. ५० आर जागा संपादीत करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर अंतिम टप्प्यात असुन लवकरच त्यास मंजुरी मिळणार आहे. त्यानंतर विविध विकास कामांसह मुलभुत सोई व सुविधा (उदा. काँक्रीटीकरण, ए. टी. एम., पिण्याचे पाणी, शौचालय, भुईकाटा इ.) उभारून इतर शेतीमालाचे लिलाव सुरू करावयाचे आहे. उगांव तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रासाठी देखील लवकरच स्वमालकीची जागा खरेदी करण्यात येणार असून तेथे लवकरच परीसरातील शेतकरी बांधवांच्या सोईसाठी बेदाणा शेतीमालाचे लिलाव सुरू करावयाचे आहे असे जगताप यांनी सांगितले.

भविष्यातही शेतकरी बांधवांसाठी जास्तीत जास्त सुविधा कशा उपलब्ध करून देता येतील यासाठी मी व माझे सदस्य मंडळ नेहमी प्रयत्नशील राहील. त्याच अनुषंगाने बाजार समिती दरवर्षी शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर असलेली शेतमाल तारण योजना स्वनिधीतुन राबवित असुन त्याचा लाभ कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. बाजार समितीने आजवर शेतकरी व इतर मार्केट घटकांच्या सोई व सुविधेसाठी राबविलेल्या कांदा अनुदान व शेतमाल तारण कर्ज योजना, वैकुंठ रथाची व्यवस्था, रोख चुकवतीची अंमलबजावणी, साफसफाईसाठी स्वतंत्र कर्मचारी व नविन ट्रॅक्टर खरेदी, शुध्द व थंड पिण्याचे पाण्यासाठी R. O. Plant यंत्रणा, व्हॉट्सॲपद्वारे आवक व बाजारभावाची माहिती, कामगारांसाठी कामगार भवन, कार्यालयीन इमारत, रस्ते व वाहनतळाचे काँक्रीटीकरण, भव्य लिलाव शेड, इलेक्ट्रॉनिक भुईकाटा आदि उपक्रमांची त्यांनी माहिती दिली.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती संदीप दरेकर, सदस्य बाळासाहेब क्षिरसागर, भिमराज काळे, जयदत्त होळकर, गणेश डोमाडे, राजेंद्र डोखळे, सौ. सुवर्णा जगताप, डॉ. श्रीकांत आवारे, तानाजी आंधळे, पंढरीनाथ थोरे, महेश पठाडे, राजेंद्र बोरगुडे, प्रविण कदम, बाळासाहेब दराडे, रमेश पालवे, सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत, सहाय्यक सचिव सुरेश विखे, सुशील वाढवणे, लेखापाल पांडुरंग खैरे, काकासाहेब जगताप, पंकज होळकर, हिरालाल सोनारे, संदीप होळकर, संजय होळकर, संतोष गायकर, राहुल शेजवळ, स्वप्निल पवार, रामदास गायकवाड, ज्ञानेश्वर जगताप, गणेश आहेर, संदीप शेलार, अरूण कुऱ्हाडे, शुभम उपाध्ये यांचेसह शांताराम जाधव, गोपीनाथ ठुबे, प्रमोद पवार, वाल्मिक मुदगुल, दशरथ वावधाने व सभासद शेतकरी, व्यापारी, माथाडी-मापारी कामगार, बाजार समितीचे सर्व कर्मचारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार बाजार समितीचे सदस्य राजेंद्र डोखळे यांनी मानले.

## सावंगा (बु.) येथे एका अल्पवयीन बालीकेचा विवाह रोखला

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

**दिग्रस :** दिग्रस तालुक्यातील सावंगा (बु), येथील एका १७ वर्षीय अल्पवयीन बालिकेचा विवाह होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर तात्काळ कारवाई करत चाईल्ड हेल्प लाईन १०९८ आणि बाल संरक्षण विभागाने संयुक्त पथकाच्या मदतीने हा बालविवाह रोखला.चाईल्ड हेल्प लाईनला या विवाहाबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळाल्यानंतर सावंगा (बु) येथील अंगणवाडी सेविका यांच्याकडून बालिकेच्या वयाची नोंद तपासण्यात आली. नोंदीनुसार मुलीचे वय १७ वर्षे ६ महिने असल्याचे स्पष्ट झाले. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार मुलीचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे, तर मुलाचे वय २१ वर्षे असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा विवाह बेकायदेशीर ठरत होता.यानंतर चाईल्ड हेल्प लाईनचे अधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास विभागाचे पथक संबंधित पत्त्यावर पोहोचले. बालिकेच्या पालकांना समुपदेशन करून अल्पवयात लग्न केल्यास होणारे कायदेशीर परिणाम व शिक्षा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. पालकांना सांगण्यात आले की, अल्पवयीनांचे लग्न लावणारे किंवा त्यास सहकार्य करणारे जसे की मंडप, डेकोरेशन, फोटोग्राफी, भोजन व्यवस्था इ. सेवा पुरवणारे यांच्यावरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. अशा गुन्ह्यांसाठी दोन वर्षे कारावास व एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. पालकांना मा. बालकल्याण समिती, यवतमाळ यांच्या समक्ष उपस्थित राहण्याचे सूचनापत्र देण्यात आले आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर, आणि चाईल्ड हेल्प लाईन समन्वयक फाल्गुन पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गणेश आत्राम, पूजा शेलारे, तसेच सावंगा गावातील व्ही. आर. मंगळे ग्रामसेवक रविकांत निकम सरपंच, महादेव सपरे तंटामुक्ती अध्यक्ष आणि दिग्रस पोलिस स्टेशनचे सहाय्यक उपनिरीक्षक रवींद्र जगताप व पोलीस कॉन्स्टेबल यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. जिल्हा बाल संरक्षण कक्षाने गावात कुठेही बालविवाहाची माहिती मिळाल्यास ती त्वरित ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका किंवा थेट चाईल्ड हेल्प लाईन १०९८ वर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णतः गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन केले.

# कन्या भ्रूणहत्या रोखण्यासाठी वाशिम प्रशासनाचे मोठे पाऊल

## पीसीपीएनडीटी आणि एमटीपी कायद्यांतर्गत डीकॉय प्रकरणासाठी मदत करणाऱ्या माहिती दारास मिळणार एक लाख रुपयांचे बक्षीस

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**



**वाशिम :** कन्याभ्रूणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणा पूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पी सी पी एन डी टी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणारे विषयी खात्रीशीर माहिती दिली, आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित माहिती दारा रु. १ लाखाचे बक्षीस देण्यात येणार आहे.

ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात असून, तिचा उद्देश कन्याभ्रूणहत्या थांबवणे, लिंग गुणोत्तर सुधारणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे दि. ३१आक्टोंबर रोजी जिल्हा रुग्णालयातील जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्ष डॉ. अलका मकासरे, डॉ. अनिल कावरखे जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी, डॉ. जया बिबेकर, डॉ. उज्वला गिऱ्हे, डॉ. बाहेती ॲड, मोहन गंगावणे, विधी सल्लागार ॲड, राधा नरवलिया आदी उपस्थित होते. गर्भधारणे पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंगनिवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायदे अंतर्गत राबविलेल्या यशस्वी कारवाई बाबत माहिती देणाऱ्या नागरिकास एक लाख रुपये बक्षीस दिले जाईल. माहिती पूर्णपणे ठेवली जाईल आणि संबंधी त्याची ओळख सुरक्षित राहील नोंदणीसाठी http://amchimulgi .maha. in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. संपर्कासाठी राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५,१०४ वर संपर्क साधता येईल सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून या योजनेचा लाभ घ्या-तुमच्या माहिती द्वारे एका चिमुकल्या जीवाला जीवनदान मिळू शकते.

कन्या भ्रूण हत्या थांबवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. बक्षीस योजनेद्वारे जनजागृती होईल लिंगनिषदास प्रतिबंध घालण्यास मदत होईल. प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही सहकार्य करावे.
मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान

कन्या भ्रूणहत्या ही केवळ कायद्याचा विषयी नाही, तर ती सामाजिक चेतनेची गरज आहे. नागरिकांनी पुढाकार घेऊन अशा बेकायदेशीर तृत्यांची माहिती प्रशासनाला दिल्यास एका मुलीचा जीव वाचतो आणि समाजाचा दृष्टिकोन बदलतो. जिल्हा प्रशासन या मोहिमेला प्रभावीपणे राबविण्यात कटिबद्ध आहे.
जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

लिंग निवड चाचण्या आणि कन्याभ्रूणहत्या या गंभीर सामाजिक समस्या आहेत. वाशिम जिल्ह्यात राबविण्यात येणारी बक्षीस योजना ही स्त्री भ्रणाच्या संरक्षणासाठी प्रभावी पाऊल आहे. नागरिकांनी अशा प्रकरणाची माहिती दिल्यास प्रशासन तातडीने कारवाई करेल.
जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे

## जोगेश्वरी (पूर्व) मध्ये मालवणी कोकणी जत्रोत्सव २०२५ ला उत्साहात प्रारंभ

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**










**जोगेश्वरी (मुंबई)** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार श्री. अनंत (बाळा) नर यांच्या पुढाकाराने आयोजित "मालवणी कोकणी जत्रोत्सव २०२५" या पारंपरिक उत्सवाचा भव्य शुभारंभ शनिवारी संध्याकाळी मोठ्या उत्साहात झाला. स्थानिक मान्यवर, शिवसैनिक, आणि नागरिकांच्या उपस्थितीत जत्रेचे उद्घाटन पार पडले असून परिसरात आनंद, परंपरा आणि संस्कृतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात जोगेश्वरी विभागातील ज्येष्ठ लोककलावंत श्री. गजानन (गजा) सावंत यांच्या "गाऱ्हाण्या"ने करण्यात आली. त्यांच्या सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले आणि जत्रोत्सवाला पारंपरिक सुरुवात लाभली.

या जत्रेत दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध दशावतारी नाट्यप्रयोग, लोककला, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, आणि मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे, कोकणी-मालवणी संस्कृतीचा वारसा जपणे आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वर्षीच्या जत्रोत्सवाचे कार्यक्रम वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे :

रविवार, २६/१०/२५ – मराठी वाद्यवृंद

सोमवार , २७/१०/२५ – आरोळकर दशावतार, आरवली

मंगळवार, २८/१०/२५ – चेंदवणकर गोरे दशावतार, कवठी (कुडाळ)

बुधवार, २९/१०/२५ – खानोलकर दशावतार, खानोली

गुरुवार, ३०/१०/२५ – श्री देवी भगवती दशावतार, मुणगे

शुक्रवार, ३१/१०/२५ – माऊली दशावतार

शनिवार, ०१/११/२५ – बहारदार लावणी

रविवार, ०२/११/२५ – बाबी कलिंगण कलेश्वर दशावतार

(०२ तारखेनंतरचे कार्यक्रम जत्रा समितीमार्फत लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत.)

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन पेप्सी गोडाऊन येथील महापालिका उद्यान, हाय-वे शेजारी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई – ४०० ०६० येथे करण्यात आले आहे.

मालवणी कोकणी जत्रोत्सव हा गेली अनेक वर्षे जोगेश्वरीच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला असून, यंदाचा उत्सवही त्याच परंपरेला भव्य स्वरूपात पुढे नेणारा ठरत आहे.

## जीवन क्षणभंगुर आहे, जागे व्हा आणि ईश्वर नामस्मरणाने जीवनाचे सार्थक करा" - ह.भ.प. पूजाताई थोरात

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा(ता. आष्टी, बीड)**



गावातील श्रद्धास्थान असलेल्या कै. विठोबा परबतराव माळशीकारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त शनिवार, दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री क्षेत्र अंभोरा येथे एक भावपूर्ण आणि प्रेरणादायी प्रवचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन माळशीकारे परिवाराने मोठ्या भक्तिभावाने केले होते.

या प्रसंगी सुप्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. पूजाताई महाराज थोरात (बांदखेल) यांनी आपल्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविकांच्या अंतःकरणाला स्पर्श करणारे प्रवचन सादर केले. त्यांनी प्रवचनामध्ये जीवनाचे खरे तत्त्वज्ञान उलगडत, भाविकांना विचार करायला लावणारे संदेश दिले.

प्रवचनाच्या प्रारंभी त्यांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग —

"रंगी रंगे रे श्रीरंगे, काय भुललासी पतंगे...

शरीर जायाचे ठेवणे, धारीसी अभिलाष झणे..."

याचा दाखला देत जीवनाचे क्षणभंगुर स्वरूप स्पष्ट केले. पूजाताई म्हणाल्या, "जीवन हे अत्यंत नाजूक आणि क्षणभंगुर आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात जागरूक राहून ईश्वर नामाने जीवनाचे सार्थक करावे. . वेळ आहे तोपर्यंतच बदल आणि नामस्मरण आवश्यक आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, "आपण या जगात काही घेऊन येत नाही आणि काही नेतही नाही. मात्र, आपल्या चांगल्या कर्मांचेच फळ मागे उरते. म्हणूनच आपण केलेले सद्वर्तन, सेवा आणि ईश्वरभक्ती हेच आपले खरे धन आहे."

प्रवचनादरम्यान पूजाताईंनी आई-वडिलांची सेवा करण्याचे मोलही अधोरेखित केले.

त्या म्हणाल्या, "आई-वडिलांची सेवा केली, त्यांना सुख दिलं, तर कोणत्याही तीर्थयात्रेला जाण्याची गरज उरत नाही. त्यांच्या चरणांची सेवा हीच खरी तीर्थयात्रा आहे. त्यांच्या आशीर्वादानेच जीवन समृद्ध आणि सुखी होते."

कीर्तनात त्यांनी संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ यांच्या विचारांचा उल्लेख करत भक्तीमार्गाचे महत्त्व समजावले. त्या म्हणाल्या, "भक्ती ही माणसाला संकटातून बाहेर काढते, ती आत्मशांती आणि जीवनाचे खरे सौंदर्य दाखवते. संसारात राहूनही नामस्मरण केल्यास जीवन सार्थक होते."

कार्यक्रमानंतर उपस्थितांनी पूजाताईंच्या प्रवचनाचे कौतुक करत, "प्रवचनातून जीवनाचा खरा अर्थ समजला" असे समाधान व्यक्त केले. शेवटी माळशीकारे परिवाराच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी कै. विठोबा परबतराव माळशीकारे यांच्या पवित्र स्मृतीस सर्व उपस्थितांनी पुष्पांजली अर्पण करून श्रद्धांजली वाहिली आणि त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना करण्यात आली.

# ३ नोव्हेंबर पासून श्री बद्रीनाथ यात्रा उत्सवाचा प्रारंभ

संत श्री सखाराम महाराज यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या बोरी नदीच्या तीरावर असलेल्या खान्देश मधील जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील बहादरपूर,शिरसोदे,महाळपुर पंचक्रोशीत वसलेल्या बहादरपूर गावात १२जून १९२४ रोजी श्रीमंत शेठ कै.रामलाल काळूराम मिश्र यांनी श्री. बद्रीनारायन मंदिराची स्थापना केली.

पूर्वी हिमालयामधील प्रवास हा अत्यंत कष्टप्रद व खडतर होता. उंच पहाड खोल दऱ्यातून पाय वाटेच्या माध्यमाने भाविक श्री बद्रीनारायन श्री केदारनाथ यांची यात्रा प्रतिकूल हवामान दळण वळणाची अत्यल्प साधने यांच्या सहाय्याने श्री बद्रीनाथावरील भक्ति पोटी सर्व कष्टांना तोंड देत करत असत. बहादरपूर गावाचे रहिवाशी असलेले कै.रामलाल काळूराम मिश्र यांनीही भगवंताच्या भक्तिपोटी श्री बद्रीनाथ यात्रेला जायचे ठरवले.

भगवंताचा नावाचा गजर करत सादर दांपन्त्य श्री भगवंताच्या दर्शनासाठी निघून आपल्या जन्माचे सार्थक केले.कष्टमय प्रवास अनेक अडचणींना तोंड देत मिश्र दामंप्त्य भगवंताच्या दर्शनास पोहचले.

परंतु देवाच्या मनात काहीतरी वेगळेच असावे.मिश्र दाम्पंत्य देवाचं दर्शन घेणार तोच तेथील पूजऱ्याने त्यांना हटकले.तुम्ही ब्राह्मण नाहीत,तुम्ही देवाचा पाया पडू शकणार नाहीत तुम्हाला दर्शनाचा अधिकार नाही असे उर्मटपणे सांगून सदर दाम्पत्यास देवाचा दर्शनापासून वंचित ठेवले. मिश्र यांनी आम्ही ब्राह्मणच आहोत असे वारंवार सांगून देखील तेथील पूजऱ्याने त्यांना दर्शन रांगेतून बाहेर काढले.देवाच्या जवळ येवून सुद्धा आपल्याला व्यवस्थित रित्या दर्शन घेता आले नाही याची शल्य दुःख दोघ पती पत्नीस अस्वस्थ करून गेली.त्यांच्या डोळयात पानी आले भगवंत माझ्या काय असा अपराध झाला की तुझे एवढ्या लांब येवून सुद्धा दर्शन झाले नाही.

अशा विनामनस्क स्थितहीत सदर दामप्त्य आपल्या धर्मशाळेत परत आले.जीवाला लागलेली हुरहूर त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती,रात्री विचार करता करता त्यांचा डोळा लागला.

रात्री स्वप्नात त्यांना भगवंताचा भास झाला. जणू काही भगवंत आपल्या भक्ताला दर्शन देण्यासाठी रामलाल शेठ यांच्या स्वप्नात आले.त्यांनी स्वप्नात दृष्टान्त देऊन रामलाल शेठ यांना सांगितले आज तुला दर्शन झाले नाही ना.. मग मला तुझ्या गावी घेऊन चल.. आणि माझी विधिवत स्थापना करून रोज माझे दर्शन घे.सकाळी उठल्यानंतर त्यांनी सदर प्रकार आपल्या पत्नीस सांगितला. त्यांच्या पत्नी कै.सौ.कलावती आई यांनी मालकांना हा देवाचा आपणासाठी आदेश आहे.आपण देवाने सांगितल्याप्रमाणे आचरण करावे.

आता मालकांना कधी एकदा घरी पोहचतो आणि देवाच्या आदेशानुसार कधी एकदा मंदिर उभारतो याचा ध्यास लागला. गावी परत आल्यावर आपल्या मालकीची २७ गुंठे जमीन श्री बद्रीनारायन देवतेच्या नावे करून विधिवत मंदिर उभारण्याचे काम सुरू केले.श्री.बद्रीनाथ भगवंताच्या मूर्ती जयपूर येथील कारागिरांकडून बनवण्यात आल्या. अत्यंत सुंदर,सुबक,आखीव,

रेखीव अशा मुर्ती जयपूर येथील कारागिरांनी बनवून दिल्या.

१२जून १९२५ रोजी श्री बद्रीनारायनजी,श्री लक्ष्मीजी,श्री केदारनाथ जी तसेच श्री उद्धव,श्री कुबेर,श्री गणेश,श्री नारणारायन,श्री नारद,व श्री गरुड महाराज यांची विधिवत स्थापना काशी च्या तसेच गावातील ब्राम्हणाच्या मार्गदर्शना खाली करण्यात आली.

मागील वर्षी म्हणजेच सन २०२४मध्ये मंदिराला १०० वर्ष पूर्ण झाले.श्री बद्रीनाथाचे भारतातील द्वितीय स्थान असलेले मंदिर हे जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील बहादरपुर गावी केवळ मालक कै.रामलाल काळूराम मिश्र यांच्या प्रयत्नाने आत्म समर्पणाने उभारले गेले.

मालक एवढयावरच थांबले नाहीत,मालकांच्या मनात जाती पाती भेद नष्ट करणे तसेच धार्मिक सलोखा वाढवून सर्व जन आनंदाने व गुण्या गोविंदाने राहावे,यासाठी श्री बद्रीनाथ भगवंताच्या यात्रेचे नियोजन केले.त्यांच्या दूर दृष्टीमुळे आज गावात आपले पणाची भावना निर्माण झाली.गावातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होऊ नये,यासाठी नूतन शिक्षण संस्थेची मुहूर्त मेढ रोवून गावातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नती मध्ये मोलाचे योगदान दिले.

त्यांनी भगवंतसाठी अत्यंत सुबक असे वहन,भव्य दिव्य असा रथ गावातील कारागीर कै.पुंजु बाविस्कर व त्यांचे सहकारी यांनी तयार केला.सदर रथाची ऊंची ३० फुट असून तालुक्यातील भव्य रथांमध्ये त्याची गणना होते.

दरवर्षी कार्तिक शु. त्रयोदशी रोजी सायंकाळी श्री वहनाची अत्यंत भव्य अशी मिरवणूक निघते. लाईटयांच्या झगमगाट ढोल ताशांचा गजर शाळेतील विद्यार्थ्यांचे आकर्षक असे ढोल व लेजीम पथक,गावातील विविध मंडळाचे ढोल पथक,यांच्या उत्साही वातावरणात बद्रीनाथाची मिरवणूक संध्याकाळी गावातून निघते.

भगवंताचा रथ पूर्ण उत्साहात कार्तिक शुद्ध चतुर्दशी रोजी वरील प्रमाणे उत्साहात व आनंदात भगवंताच्या नामाचा गाजर करत गावातून भक्तांना दर्शनासाठी परिक्रमा करतो.

कार्तिक शुद्ध पौर्णिमेस भगवंत पालखीत आरुढ होऊन भक्तांच्या दर्शनासाठी गावात येतात.याच साठी केला होता अट्टाहास ही मालकांची मनातील भावना पूर्णत्वास गेल्याचे समाधान सगळयांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते.मी एवढ्या लांब येवून ही मला देवाचे नीट दर्शन घेत आले नाही परंतु,माझ्या पंचक्रोशीतील भक्तांना सहज दर्शन उपलब्ध व्हावे,ही भावना त्यांच्या मनात होती.ती पूर्ण होते.

यात्रे निमित्त गावातील बाहेर गावी स्थायिक झालेली मंडळी दरवर्षी यात्रेच्या निमित्ताने बहादरपूर गावात येतात आपल्या इष्ट मित्रांच्या भेटी गाठी घेण्याचा योग यात्रेनिमित्त येतो. नात्यातील विण यामुळे अधिकच घट्ट होण्यास मदत होते.

माझे मी पण गळून जावो,ही उक्ती सार्थ झाल्याचे यावेळेस आपल्याला पाहायला मिळते.

यंदा वहन दि. ३ नोव्हेंबर,रथ दि. ४ नोव्हेंबर,पालखी दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी तर ६ नोव्हेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी भगवंताच्या दर्शनाचा लाभ घ्यावा व आपल्या जन्मयचे सार्थक करावे असे आवाहन श्री संत ज्ञानेश्वर माऊली ब्राह्मण समाज बहु.संस्था बहादरपूर यांच्या पदाधिकाऱ्यांकडून भाविकांना करण्यात येत आहे.

**शब्दांकन : श्री.भूपेंद्र कुलकर्णी**
**श्री.संत ज्ञानेश्वर माऊली ब्राह्मण समाज बहु. संस्था बहादरपूर (रजि)**



# सद्गुरू यांनी 'रामायण' मधील रणबीर कपूरच्या भूमिकेबद्दल केलं विधान...

अभिनेता रणबीर कपूर त्याच्या १५ वर्षांच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच धार्मिक भूमिका साकारणार आहे. तो नमित मल्होत्रा आणि नितेश तिवारी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट 'रामायण'मध्ये श्री रामाच्या भूमिकेत दिसेल. चित्रपटाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेनं वाट पाहत आहेत. हा चित्रपट दोन भागामध्ये प्रदर्शित होईल. पहिला भाग २०२६मध्ये प्रदर्शित होत असून दुसरा भाग २०२७ मध्ये रामनवमीच्या निमित्तानं दिवाळीमध्ये प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात प्रमुख कलाकारांसह मोठी स्टारकास्ट असणार आहे. दरम्यान, रणबीर कपूरला त्याच्या भूमिकेसाठी टीकेचा सामना करावा लागत आहे. आता, सद्गुरूंनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच विवेकनं 'रामायण'साठी फी कोणाला दान केली याबद्दल देखील आता उघड झालं आहे.




**रणबीर कपूरच्या भूमिकेवर सद्गुरूंची प्रतिक्रिया :** ४००० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवलेल्या 'रामायण' चित्रपटाचे निर्माते नमित मल्होत्रा यांनी सद्गुरूंशी विशेष चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्यांनी सद्गुरूंना असेही विचारले की, अभिनेता रणबीर कपूरला 'रामायण' चित्रपटात भगवान रामाची भूमिका साकारत आहे आणि त्यासाठी त्याला बरीच टीका सहन करावी लागली आहे.

यावर त्यांचं काय म्हणणं आहे? निर्मात्याच्या प्रश्नाच्या उत्तरात सद्गुरू म्हणाले, "हे कोणत्याही अभिनेत्यासाठी गैरसमज उघड करते, परंतु रणबीरसाठी हे एक आव्हान आहे, कारण त्यानं त्याच्या मागील चित्रपटांमध्ये अशा काही भूमिका केल्या असतील, ज्या त्याच्याकडून अपेक्षित नसतील. तो उद्या रावणाची भूमिका देखील करू शकतो, कारण अभिनय हा त्याचा व्यवसाय आहे आणि त्याला जी भूमिका दिली जाईल ती तो त्याच्या मनानं करेल."

**दक्षिणातील सुपरस्टार एनटी रामा राव यांचं उदाहरण दिले :** इतकेच नाही तर सद्गुरूंनी टॉलीवूड स्टार एनटी रामा राव यांचे एक विशेष उदाहरण दिले. ते म्हणाले, "एनटी रामा राव यांनी सुमारे १५ दक्षिण भारतीय चित्रपटांमध्ये भगवान कृष्णाची भूमिका केली होती. लोक अजूनही त्यांची पूजा करतात, त्यांचे मोठे कटआउट लावले गेले होते आणि त्यांच्या प्रतिमेमुळं त्यांनी निवडणुकीत मोठा विजय मिळवला. आजचा काळही असाच आहे, तुम्हाला फक्त थोडी नम्रता दाखवण्याची गरज आहे. पण आशा आहे की, रामची भूमिका केल्यानंतर रणबीर बदलेल आणि त्याच्या भूमिकेतून बरेच काही शिकेल, जे त्याच्यासाठी चांगले असेल."

**चित्रपटातील स्टारकास्ट आणि त्यांच्या भूमिका :** या चित्रपटात भगवान रामच्या भूमिकेत रणबीर कपूर, माता सीतेच्या भूमिकेत साई पल्लवी, रावणाच्या भूमिकेत केजीएफ अभिनेता यश, हनुमानाच्या भूमिकेत सनी देओल, दशरथाच्या भूमिकेत अरुण गोविल, कैकेयीच्या भूमिकेत लारा दत्ता, मंदोदरीच्या भूमिकेत काजल अग्रवाल आणि रावणाचा भाऊ विभीषणाच्या भूमिकेत विवेक ओबेरॉय आहेत. विवेक ओबेरॉयनं आपली फी ही कर्करोगानं ग्रस्त मुलांसाठी दान करण्याची घोषणा केली आहे.

याशिवाय त्यानं सांगितलं की, त्यांना नमित मल्होत्राचं काम खूप आवडलंय.

## एक्कीस' चित्रपटातून अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण

अभिनेता अहान पांडे आणि अनीत पड्डानंतर, एक नवीन चेहरा बॉलिवूडमध्ये चमकण्यासाठी सज्ज आहे. अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया ही श्रीराम राघवन दिग्दर्शित 'एक्कीस' चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे. आता अक्षयनं त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर सिमरच्या मोठ्या पडद्यावर पदार्पणाबद्दल आनंद व्यक्त करत पोस्ट आणि ट्रेलर शेअर केला आहे. त्यानं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं, "माझी छोटी सिमी आता इतकी लहान नाही... 'एक्कीस'मधील तुझ्या लिविंग रूम परफॉर्मन्सपासून तर मोठ्या पडद्यावर, माझे मन अभिमानानं भरले आहे! @simarbhatia१८. आणि अगस्त्याची, किती छान पडद्यावर उपस्थिती! संपूर्ण टीमला खूप खूप शुभेच्छा."



**ट्विंकलनं सिमर भाटियावर केला प्रेमाचा वर्षाव :** यानंतर सिमरनं तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर अक्षयची पोस्ट पुन्हा शेअर करत उत्तर दिलं, 'मी नेहमीच तुझ्यासाठी लहान सिमी राहीन. प्रत्येक गोष्टीसाठी धन्यवाद. मी तुझ्यावर खूप प्रेम करते." ट्विंकल खन्नानं देखील एक पोस्ट शेअर केली आहे यात तिनं लिहिलं, "आमच्या @simarbhatia१८ आता चित्रपट जगात प्रवेश केला आहे. किती सुंदर गोष्ट आहे. शाब्बास, माझी हुशार मुलगी." तसेच सिमरनं उत्तरात लिहिलं, 'याबद्दल खूप खूप धन्यवाद. माझ्यावर तुमचे आशीर्वाद आहेत... मला आणखी काय हवे आहे." दरम्यान सिमर भाटिया अक्षयची बहीण अलका भाटिया यांची मुलगी आहे.

**'एक्कीस' चित्रपटाबद्दल :** अलका यांनी १९९७ मध्ये वैभव कपूरशी लग्न केलं. यानंतर त्यांना पहिली मुलगी सिमर झाली. नंतर हे जोडपे वेगळे झाले. यानंतर २०१२ साली अलका यांनी रिअल इस्टेट टायकून सुरेंद्र हिरानंदानीबरोबर लग्न केलं. 'एक्कीस' चित्रपटात भारतातील सर्वात तरुण परमवीर चक्र विजेता, सेकंड लेफ्टनंट अरुण खेतरपाल यांच्या शौर्याबद्दलची कहाणी सांगितली जात आहे. जेव्हा ते युद्धात हुतात्मा झाले तेव्हा त्याचे वय फक्त २१ वय वर्षाचं होतं. निर्मात्यांनी ट्रेलर रिलीज करताना पोस्टमध्ये लिहिलं, 'तो एकवीस वर्षांचा होता, तो नेहमीच एकवीस वर्षांचा राहील!' या चित्रपटामध्ये अभिनेता धर्मेंद्र अरुण खेतरपालच्या वडिलांची भूमिका करत आहे. तसेच जयदीप अहलावत चित्रपटात भारतीय सैन्य अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन श्रीराम राघवन यांनी केलं असून याची निर्मिती दिनेश विजन करत आहे.

### पारंपरिक लोककला आणि आधुनिकतेचा संगम

## गोंधळचा ट्रेलर रिलीज

आपल्या मराठी संस्कृतीचा आणि श्रद्धांचा अविभाज्य भाग असलेला 'गोंधळ'. नवरा-नवरीच्या आयुष्यातील विघ्नं दूर करण्यासाठी साजरा होणारा एक पारंपरिक विधी आणि हाच पारंपरिक गोंधळ आता रुपेरी पडद्यावर अवतरतोय! राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक संतोष डावखर दिग्दर्शित आणि डावखर फिल्म्स प्रस्तुत 'गोंधळ' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर लाँच सोहळा नुकताच स्थानिकांच्या उपस्थितीत थाटात पार पडला. या सोहळ्यात खऱ्या अर्थाने गोंधळ घालण्यात आला. पारंपरिक वाद्यांचे नाद, नृत्य, आणि मंत्रोच्चारांनी वातावरण भारून गेले होते. या पारंपरिक सादरीकरणाने लाँच सोहळ्याला एक आगळं-वेगळं सांस्कृतिक स्वरूप प्राप्त झालं.




प्रेक्षकांच्या मनात आधीच उत्सुकता निर्माण झालेल्या या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ट्रेलरमध्ये कथानकात काहीतरी गूढ असल्याचे कळतेय.

प्रत्येक व्यक्तिरेखा काहीतरी सांगतेय. त्यामुळेच चित्रपटाची उत्कंठा अधिक वाढतेय. भव्य सादरीकरण, प्रभावी सिनेमॅटोग्राफी, तांत्रिक उत्कृष्टता आणि संस्कृतीशी घट्ट नातं सांगणारं कथानक, या सर्व बाबींमुळे 'गोंधळ' आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिनेमा ठरणार, असा विश्वास प्रेक्षक व्यक्त करत आहेत.

ट्रेलरमधून पारंपरिक श्रद्धा, लोककला आणि आधुनिक सिनेमॅटिक मांडणीचा अप्रतिम संगम दिसतो. नवरा-नवरीच्या आयुष्यातील विघ्नं दूर करण्यासाठी साजऱ्या होणाऱ्या गोंधळाच्या माध्यमातून उलगडणारी ही कथा काहीतरी अनपेक्षित आणि रहस्यमय वळण घेऊन येत असल्याचे ट्रेलरमध्ये कळतेय.

चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक संतोष डावखर म्हणाले, 'गोंधळ' म्हणजे आपल्या मातीतली आणि संस्कृतीतली कहाणी आहे. आत्मा, लोककलेचा वारसा आणि आधुनिकतेचा संगम यात प्रेक्षकांना अनुभवयाला मिळणार आहे. आपल्या मातीत रुजलेल्या श्रद्धा, परंपरा आणि विधींना आम्ही एका नव्या दृश्यात्मक रूपात मांडण्याचा प्रयत्न केला असून या चित्रपटामागे एक समर्पित आणि कल्पक टीम कार्यरत आहे. प्रत्येक दृश्य, प्रत्येक संवाद आणि प्रत्येक सूर हा आपल्या संस्कृतीचा स्पंदन अनुभवायला लावेल. 'गोंधळ' प्रेक्षकांना केवळ मनोरंजन नाही, तर एक भावनिक आणि भव्य अनुभव देईल, जो मनात बराच काळ रुंजी घालेल, याची मला खात्री आहे'.

चित्रपट आपल्या मातीतील असून टिझर, ट्रेलर पाहून हा चित्रपट नेमका काय आहे, याचा अंदाज लावणं कठीण आहे. त्यामुळे हे जाणून घेण्याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे 'गोंधळ'ची कथा, पटकथा आणि संवाद स्वतः संतोष डावखर यांनी लिहिले असून सहनिर्माती दीक्षा डावखर आहेत.

या चित्रपटात किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहोनी, निषाद भोईर, अनुज प्रभू, सुरेश विश्वकर्मा, माधवी जुवेकर, ऐश्वर्या शिंदे, कैलाश वाघमारे, प्रभाकर मठपती, विठ्ठल काळे, प्रवीण डाळींबकर, शरद जाधव, पूनम पाटील आणि ध्रुव ठोके हे नामवंत कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. 'गोंधळ' हा चित्रपट १४ नोव्हेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असून प्रेक्षकांना एक भव्य, रहस्यमय आणि सांस्कृतिक प्रवास घडवेल, यात शंका नाही.

## उमेश - प्रियाची बिन लग्नाची गोष्ट ॲमेझॉन प्राईमवर ट्रेंडिंग

नात्यांचा गुंता, प्रेमातील गोडवा आणि थोडीशी नोकझोक सांगणारा 'बिन लग्नाची गोष्ट' हा चित्रपट सध्या ॲमेझॉन प्राईमवर ट्रेंडिंग ठरत आहे. चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर आता ओटीटीवरही या चित्रपटाने पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. नात्यांमधील समज, मतभेद, विश्वास आणि जिव्हाळा या सगळ्यांचा सुंदर मिलाफ या चित्रपटात पाहायला मिळतो. आधुनिक काळातील नात्यांकडे नव्या दृष्टीने पाहाणारा हा चित्रपट प्रेक्षकांना आपलासा वाटत आहे.

प्रिया बापट आणि उमेश कामत या रिअल लाईफ कपलची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना नेहमीच भावली आहे आणि या चित्रपटातही त्यांच्या नात्यातील गोड तिखट प्रसंगांनी प्रेक्षकांना भावनिक केले आहे. त्यांच्या सोबत गिरीश ओक, निवेदिता सराफ, सुकन्या मोने आणि



संजय मोने यांच्या दमदार अभिनयाने चित्रपट अधिक प्रभावी झाला आहे.

दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, " 'बिन लग्नाची गोष्ट' आपल्या आजूबाजूच्या नात्यांचे प्रतिबिंब आहे. नात्यातील मतभेद, एकमेकांवरील विश्वास आणि एकत्र प्रवास हे या चित्रपटात आम्ही दाखवले आहे. ॲमेझॉन प्राईमवर चित्रपटाला मिळणारा प्रतिसाद पाहून खूप आनंद होतो."

निर्माते नितीन वैद्य म्हणतात, " हा चित्रपट नात्यांच्या बदलत्या स्वरूपावर विचार करायला भाग पाडणारा आहे. आजच्या पिढीचे आयुष्य, त्यांची नात्यांकडे पाहाण्याची दृष्टी, त्यातील गोडवा आणि संघर्ष हे या चित्रपटात मांडले आहे. चित्रपटगृहानंतर ओटीटीवर मिळणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद आमच्यासाठी बक्षीस आहे."

गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, तेजश्री अडिगे आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन प्रस्तुत 'बिन लग्नाची गोष्ट' चित्रपटाची कथा समीर कुलकर्णी यांची आहे. आदित्य इंगळे दिग्दर्शित हा चित्रपट प्रिया बापट, उमेश कामत, निवेदिता सराफ, गिरीश ओक, सुकन्या मोने आणि संजय मोने यांच्या दमदार अभिनयाने सजला आहे.

## फिल्म बाजार – २०२५ साठी मुक्काम पोस्ट देवाचे घर चित्रपटाची निवड

गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील "फिल्म बाजार" विभागासाठी राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत दरवर्षी मराठी चित्रपटांची निवड करून ते पाठविण्यात येतात. यंदा 'फिल्म बाजार – २०२५' करिता "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या मराठी चित्रपटांची निवड करण्यात आल्याची घोषणा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केली आहे.कीमाया प्रॉडक्शनचे महेश कुमार जायसवाल, किर्ती जायसवाल यांनी "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या चित्रपटाची




निर्मिती केली असून संकेत माने यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटात ग्रामीण भागातली गोष्ट मांडण्यात आली आहे. सैन्यात असलेले वडील देवाघरी गेले असं आईनं मुलीला सांगितल्यावर देवाचं घर म्हणजे काय? आणि ते कुठे असतं? याचा शोध सुरू होतो. त्याबरोबरच तिची आई आपल्या शहीद झालेल्या पतीचं पेन्शन मिळवण्यासाठी संघर्ष करत असल्याचं ट्रेलरमधून दिसतं. त्यामुळे भावनिकतेची किनार असलेल्या या कथानकाची मांडणी अतिशय हलक्याफुलक्या रंजक पद्धतीनं करण्यात आली आहे.'फिल्म बाजार'साठी देवाचे घर या चित्रपटासोबत मिलिंद कवडे दिग्द्रशित 'श्री गणेशा' या चित्रपटाचीदेखील निवड करण्यात आली आहे. यासंदर्भात महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी माहिती दिली. 'श्री गणेशा' हा मिलिंद कवडे दिग्दर्शित भावनिक कौटुंबिक चित्रपट आहे. या चित्रपटाच्या कथानकात टिकल्या (प्रथमेश परब) आणि त्याचे वडील भाऊसाहेब पाटील (शशांक शेंडे) यांच्यातील तणावपूर्ण नाते आणि त्यांच्या नात्यातील समज, प्रेम तसेच पुनर्मिलनाचा प्रवास दाखविण्यात आला आहे. एकूणच हा चित्रपट पित्याच्या जबाबदारीची जाणीव, मुलाच्या भावविश्वातील संघर्ष आणि आपुलकीचा शोध या विषयांवर आधारित आहे.

## वास्तुशास्त्रानुसार घराच्या मुख्य दाराजवळ 'या' गोष्टी ठेवल्याने पालटते नशीब


वास्तुशास्त्रात घराचे मुख्य दार हे महत्त्वाचे मानलं जातं. कारण मुख्य दारातूनच सकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करतात. त्यामुळे मुख्य दारासंबंधित काही नियम वास्तुशास्त्रात सांगण्यात आले आहेत. या नियमांचे पालन केल्यास घरात सुख- समृद्धीत वाढ होते. घराच्या मुख्य दाराजवळ काही गोष्टी ठेवणं अत्यंत शुभ मानलं जातं.

**घोड्याची नाल**

वास्तुशास्त्रात घोड्याच्या नालीला खूप महत्त्व आहे. वास्तुशास्त्रानुसार घोड्याची नाल ही घरात समृद्धी आणण्यासाठी आणि नकारात्मक ऊर्जा दूर ठेवण्यासाठी महत्त्वाची असते. त्यामुळे घराच्या मुख्य दारावर घोड्याची नाल लावणं शुभ मानलं जातं.

**गणपती**

घरात सुख- समृद्धी टिकवण्यासाठी मुख्य दारावर गणपतीची प्रतिमा किंवा चित्र असावं. पण लक्षात ठेवा



गणपतीची प्रतिमा ही घराच्या बाहेर नव्हे तर आतील बाजूला लावावी. यामुळे आर्थिक स्थिती सुधारते असं म्हणतात.

**धार्मिक चिन्ह**

घराच्या मुख्य दारावर नेहमी कुंकवाने धार्मिक चिन्ह काढावी. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला लाल स्वस्तिक, ओम काढावे किंवा तुम्ही स्टिकर देखील लावू शकता. स्वस्तिक लावल्याने घरातील वास्तू आणि दिशा दोष दूर होतो.

**लक्ष्मीची पाऊले**

घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर लक्ष्मीची पाऊले लावणे शुभ मानलं जातं. वास्तुशास्त्रानुसार लक्ष्मी माता ही मुख्य दारातूनच घरात प्रवेश करते, त्यामुळे घरात ऐश्वर्य आणि समृद्धी येते.

**तोरण**

घराच्या मुख्य दारावर नेहमी तोरण बांधावे. तोरण हे आंब्याच्या पानांचे असेल तर शुभ ठरते. कारण आंब्याची पाने घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. तसेच मुख्य दारावर हे तोरण लावल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते.

घराच्या मुख्य दाराजवळ कधीही चप्पल- बूट आणि झाडू ठेवू नये.

घराचे मुख्य दार हे नेहमी स्वच्छ असावे.

घराच्या मुख्य दाराजवळ डस्टबिन आणि सुकलेली रोपं ठेवू नये.

तसेच घराचा मुख्य दरवाजा उत्तर, पूर्व किंवा ईशान्य कोपऱ्याकडे तोंड करून असावा, कारण या दिशा शुभ मानल्या जातात.




**मेष** – खर्चाचे योग्य नियोजन करावे लागेल. मानसिक स्वास्थ्य जपावे. आपली छाप पाडण्यात यशस्वी व्हाल. आपली प्रतिष्ठा जपावी.

**वृषभ** – महत्त्वाचे काम करून घ्या. घरातील व्यक्तीची काळजी वाटेल. सहकाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. कामाचे योग्य नियोजन करावे.

**मिथुन** – अपेक्षित व्यक्तीची भेट होईल. मैत्री वाढेल. धंद्यात फायदा होईल. कला-क्रीडा स्पर्धेत चमकाल. मानापमानात अडकून पडू नका.

**कर्क** – संसारात कामाचा व्याप वाढेल. नम्र राहा. मौल्यवान खरेदी केली जाईल. कष्टाला मागे पुढे पाहू नका. उतावळेपणा करू नका.

**सिंह** – काही अनपेक्षित बदल दिसून येतील. मित्रमंडळींशी सलोखा ठेवावा लागेल. जुन्या प्रकरणातून त्रास संभवतो. प्रवासात सावध राहा.

**कन्या** – आज ठरवलेले काम उद्यावर टाकू नका. गैरसमजातून वाद वाढू देऊ नका. कोर्ट कचेरीचा प्रश्न सोडवू शकाल. नवा विषय शिकाल.

**तूळ** – अचानक आपला कार्यक्रम बदलावा लागेल. आपणास सामाजिक प्रतिष्ठा लाभेल. कोर्ट कचेरीची कामे त्रासदायक ठरू शकतात.

**वृश्चिक** – आजचे काम वेळेत पूर्ण करता येईल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी. स्पर्धेत जिंकाल. आपले मन शांत ठेवा.

**धनु** – आपण स्पर्धेत प्रगती कराल. नवीन ओळख होईल. तुमचा विचार इतरांना पटणे कठीण आहे. मित्रांशी गप्पांमध्ये वेळ घालवाल.

**मकर** – आपणास अडचणीतून मार्ग काढता येईल. स्वत:ची कामे स्वत: करा. धंद्यात आळस करू नका. एखादी पैज जिंकता येईल.

**कुंभ** – धंद्यात मोठे काम मिळेल. प्रतिष्ठा वाढेल. विरोधकांच्या कारवायांवर लक्ष ठेवा. नोकरीत फायदा होईल. नवीन गोष्टी आवडीने शिकाल.

**मीन** – कुटुंबात महत्त्वाची घटना घडेल. वाटाघाटीत यश मिळेल. व्यवसायात नवा विचार करता येईल.

# 'संगीत मॅरेथॉन'मधून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याला स्वरबद्ध सलामी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आज पनवेलमध्ये 'उत्कर्ष संगीत मैफिल' तर्फे 'संगीत मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले. या विशेष उपक्रमात ७५ गायकांनी एकापाठोपाठ ७५ सुमधुर गाणी सादर करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याला स्वरबद्ध सलामी दिली. राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक प्राधान्य देणारे, जनतेच्या मनात घर करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक थोर समाजसेवक म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली असून आजही ती तितक्याच जोमाने त्यांचे सामाजिक सुरू आहे. त्यामुळे या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर याचे अखंड सामाजिक कार्य अधोरेखित करण्यात आले. गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य कार्यक्रम पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आला होता. या संगीत मॅरेथॉन मध्ये सकाळी ११.३० वाजल्यापासून सलग साडेसात तास मराठी व हिंदी गाण्यांचे सादरीकरण झाले. गायक गोपाळ पाटील यांच्यासह उरण, पनवेल आणि नवी मुंबई येथील ७५ गायकांनी गाण्याचे सादरीकरणे केले. या कार्यक्रमाचा शुभारंभ प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. व्यासपीठावर आगमनाच्या वेळी



गायक रवी नाईक यांनी 'रामजी की निकली सवारी' हे गाणे सादर केले. त्या सुरेल सादरीकरणाच्या पार्श्वभूमीवर उपस्थितांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर पुष्पवृष्टी करत उत्स्फूर्त स्वागत केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चंद्रकांत घरत, रविनाथ पाटील, ब्रिजेश पटेल, नरसू पाटील, एकनाथ ठाकूर, नरेश रहाळकर, भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक रविंद्र भगत, ॲड. नरेश ठाकूर, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, सिमा घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, समीर कदम, दीपक शिंदे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांच्यासह रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. गेली पाच दशकाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली आहे आणि हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे. यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रमे होणार होत आहेत. या सामाजिक उपक्रमांच्या मालिकेतच 'संगीत मॅरेथॉन' हा सांस्कृतिक सोहळा एक सुरेल मेजवानी ठरली.

> **संगीत हे मनाला जोडणारे माध्यम आहे. गोपाळ पाटील यांनी चांगल्या गायकांचा संघ तयार केला आहे. अशा उपक्रमामुळे कलाकारांना वाव मिळणार आहे. आणि त्यासाठी माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा. माझ्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व गायकांचे आणि टीमचे मनःपूर्वक आभार !**
> **- लोकनेते रामशेठ ठाकूर**

या संगीत मॅरेथॉनमध्ये गोपाळ पाटील, रवी नाईक. दक्षता स्वरूप, आकांक्षा भोईर, संगिता डे, नरेश पाटील, महेंद्र पारधी, भरत जैन, राजा भोसले, हरीश मोकल, गिरीश महाडिक निना कोटियन, गिरीश गुप्ता, सुशील देशमुख, सोनल जाधव, जगन्नाथ नलावडे, कविता इंगळे, जाहिदा, पी.सी.म्हात्रे, अश्विनी परब, श्री. कमलेश, सुनिता सकपाळ, सूभेन्दू डे, समता मोदी, सारंग मोदी, शानू, शिवानी उरणकर, रुची पाटील, मनोहर पाटील, ब्रिजेश रावत, शोमा गांगुली, महेंद्र तांडेल, प्रतिभा राठोड, स्वाती पांचाळ, आनंद कांबळे, राजेंद्र ठाकूर, सतिश गवई, बी. आर. पाटील, रमेश चाफे, कविता चाफले, संतोष चाफले, डॉ. सुभाष पाटील, भालचंद्र पाटील, त्रिशा, कीर्ती, वैयजंती महामुनी, सबिता, सुचित्रा जाधव, नम्रता गोडसे, राजेश मेमन, श्री. मनोहर, श्री. कैलास, गणेश पाटील, श्री. जयदेव, दिनेश पाटील, कुलबीर सिंग, मिता सोधी, रुची सारंगी, चारू मिश्रा, राहील शेख, राजानी पौल, विद्या भंडारी, रवींद्र सेठिया, बलदीप सिंग, खदिजा हार्नेसवाला, भरत ठक्कर, अनिता राव, शालिनी कौशिक, गीता आनंद, ए. आर. गणपथी, राजेश नंदराजन, कादंबरी सपकाळ, संदीप परुळेकर, मालिनी सिवाकुमार, निर्मला नायडू, दर्शन जाधव, डॉ. तृप्ती, महेश चव्हाण, विवेक चंद्रा या गायकांचा समावेश होता.या सुरेल मॅरेथॉनमध्ये प्रभू श्रीराम, भारतीय संस्कृती, देशभक्ती, कोळीगीते तसेच चित्रपटातील गाण्यांची मनमोहक मेजवानी सादर करण्यात आली. पनवेलकरांसाठी हा सांस्कृतिक सोहळा एक सुरेल पर्वणी ठरला. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन हरीश मोकल आणि शोभा मॅडम यांनी केले.

## घाटंजीत सामाजिक सेवेला नवे पर्व!

### 'श्रीमती डॉ. स्नेहलता रमेश पांडे वृद्धाश्रम' च्या भूमिपूजनाने नवी दिशा

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि.**
**महेश पेन्दोर**

**घाटंजी :** समाजसेवेची नवी वाट खुली करत कविर बहुउद्देशीय संस्था, घाटंजी यांच्या वतीने 'श्रीमती डॉ. स्नेहलता रमेश पांडे वृद्धाश्रम या मानवसेवेच्या पवित्र उपक्रमाचे भूमिपूजन शनिवारी सकाळी मोठ्या जल्लोषात पार पडले.

रेणुकामाता मंदिराजवळील सदाशिव डंभारे यांच्या शेतात पार पडलेल्या या मंगल सोहळ्यात समाजसेवेसाठी वाहिलेल्या भावनेचा उत्सव पाहायला मिळाला. वृद्ध आणि निराधार व्यक्तींना सन्मानाने जीवन जगण्याचे आश्रयस्थान ठरणारा हा वृद्धाश्रम लवकरच उभारला जाणार असून, या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मान्यवरांची गौरवशाली





उपस्थिती ,तर उद्घाटनाचे सौभाग्य आमदार राजू तोडसाम आणि प्रियाताई तोडसाम (शिंदे) यांच्या हस्ते संपन्न झाले.विशेष अतिथी म्हणून युवा ग्रामीण पत्रकार संघ राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री गणेश कचकलवार यांची काही कारणामुळे उपस्थित नसल्यामुळे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे कार्यकर्ते

यांची उपस्थिती होती. घाटंजी तालुका अध्यक्ष महेश पेन्दोर , उपाध्यक्ष निरज मन्ने व केळापूर तालुका अध्यक्ष प्रफुल नान्ने युवा ग्रामीण पत्रकार संघ यांनी उपस्थिती नोंदवून सोहळ्याची शोभा वाढवली.

**समाजसेवकांचा एकत्रित सहभाग**

या प्रसंगी शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी व समाजसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यामध्ये पोलीस निरीक्षक केशव ठाकरे, अन्नकुमार पांडे, विजय बैस, गजानन ढवळे, राम खांडारे, विश्वासराव राऊत, सदाशिवराव डंभारे, महेश पवार, मनोज हामद, मुज्जू पटेल, संजयज अग्रवाल, संजय ढगले, रीना धनरे, रोशनी झाडे आदी मान्यवरांचा समावेश होता.

**आयोजकांचे अथक प्रयत्न**

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी क्रांतीकुमार रमेश पांडे आणि आशिष सदाशिवराव डंभारे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती या भूमिपूजनात दिसून आली.

**वृद्धाश्रम – मानवी सेवेला नवे रूप**

घाटंजीत उभारल्या जाणाऱ्या या वृद्धाश्रमामुळे समाजातील वृद्ध, निराधार आणि अपंग व्यक्तींना सुरक्षित, सन्माननीय आणि प्रेमळ वातावरण मिळणार आहे. या उपक्रमामुळे 'सेवा हीच श्रेष्ठ साधना' या विचाराला नवी उंची मिळाली आहे.

"वृद्धांचा आशीर्वाद हीच खरी संपत्ती" – या भावनेतून उभारला जाणारा हा वृद्धाश्रम घाटंजीच्या सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल.

**सणसर पंचायत समिती गणात निवडणुकीच्या तिकिटासाठी उमेदवारांची चुरस**

## प्रियंका सोनवणे कांचन चव्हाण सुरेखा ओगले काजल सोनवणे कामिनी चव्हाण यांच्यात स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गटांमध्ये अनुसूचित जातीचे आरक्षण असल्याने येथून इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या गटात चुरशीचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे.

सणसर पंचायत समिती गणासाठी अनुसूचित जाती महिला प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झालेले आहे आरक्षण जाहीर झाल्यानंतर इच्छुकांची धावपळ सुरू झाली आहे.अनेक इच्छुकांनी पंचायत समिती ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम केले आहे.काही इच्छुक सामाजिक कार्यात सक्रिय आहेत अनुसूचित जाती प्रवर्गातील अनेक दिग्गज इच्छुक म्हणून पुढे येऊ लागले आहेत.

सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही जागासाठी सणसर (हिंगणेवाडी) येथील पंचायत समितीच्या माजी उपसभापती सुरेखा सुरेश ओगले,सणसर येथील कांचन विजय चव्हाण,सणसर येथील मातंग एकता आंदोलनाचे महाराष्ट्र राज्याचे सचिव दिलीप सोनवणे यांच्या सुनबाई प्रियंका शुभम सोनवणे भवानीनगर येथील पै अजित अरुण सोनवणे यांची पत्नी काजल अजित सोनवणे सणसर येथील सोसायटीचे माजी चेअरमन विजय प्रभाकर चव्हाण सर यांची पत्नी कांचन विजय चव्हाण सणसर ग्रामपंचायतच्या माजी सदस्या कामिनी चव्हाण अशी इच्छुकांची नावे चर्चेत येऊ लागली आहेत.

या इच्छुकांनी आतापासूनच जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी आपापल्या पक्षाच्या नेते मंडळींकडे संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषदेसाठी व सणसर पंचायत समिती गणांसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील अनेक दिग्गज निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत असल्यामुळे ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष भारतीय जनता पार्टी,शिवसेना शेतकरी संघटना अशा सर्वच पक्षातून इच्छुकांची संख्या वाढत आहे. याबरोबरच काही इच्छुकांनी निवडणुकीमध्ये कोणत्याही पक्षाचे तिकीट मिळाले तरी चालेल परंतु निवडणूक लढवायची असा निर्धार करून गावा गावातील ठराविक मतदारांच्या भेटीगाठींवर पै अजित सोनवणे दिलीप सोनवणे यांनी भर दिला आहे.

## रण फॉर युनिटी देशाच्या एकतेसाठी आखाडाबाळापूर पोलीस स्टेशन चा प्रेरणादायी उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**विजय खुडे तालुका प्रतिनिधी कळमनुरी**

देशाचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150व्या जयंतीनिमित्त आज दिनांक 31 आक्टोबर 2025 रोजी बाळापूर पोलीस स्टेशन द्वारा "एक कदम देश की एकता और अखंडता के लिये "रन फॉर युनिटी या मेरोथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते ही स्पर्धा विष्णूकांत गुट्टे साहेब पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शन खाली रेणुकाई क्रीडा मंडळ येहळेगाव (तू )द्वारा यांच्या सहकार्याने दि 31 ला कांडली येथे मुलं 5की मी मुली 3 की मी स्पर्धेचा समारोप झाला. कार्यक्रम मध्ये प्रथम द्वितंय तृत्यय क्रमांक येणाऱ्या 5km प्रथम क्रमांक शिवम शिंदे द्वितीय सुरेश काळे तृतीय अनुराधा गिरे व. ( 3किमी मध्ये प्रथम शुभांगी राठोड द्वतीय पायल राठोड तृतीय अनुराधा गिरे येणाऱ्या सर्व स्पर्धाकांना योग्य ते बक्षीस देण्यात येणार आहे यात युवक युवती चा भरखोस प्रतिसाद मिळत आहे

## तहसील कार्यालय खेड येथे पच्छिम भागातील रस्त्याची झालेली दुरावस्था व अतिवृष्टीमुळे भात पिकाचे नुकसान याबद्दल पश्चिम भागाच्या वतीने तहसिदाराना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओहाळ**

**:** तहसील कार्यालय खेड येथे तहसीलदार साहेबांना भेटून पच्छिम भागातील रस्त्याची झालेली दुरावस्था यामध्ये पाईट-वांद्रा रस्ता, गडद-वांद्रा रस्ता, सातकरवाडी-औंढे गावठाण-परसूल-खरपुड-कुडे रस्ता, वाशेरे-कुडे-घोटवडी-धामणगाव रस्ता याबाबत माहिती सांगितली तसेच अतिवृष्टीमुळे भात पिकाचे जे नुकसान झाले आहे त्याचेही वीडियो सकट सादरीकरण केले असून त्यासंबंधित निवेदन देण्यात आले.

निवेदन देण्यासाठी पच्छिम भागातील अनेक गावतील सरपंच,नेते मंडळी आणि काही इच्छुक उमेदवार सुद्धा आले होते त्याचेही खूप खूप आभार!

याचे संपूर्ण नियोजन श्री दत्तात्रय सुतार मा. उपसरपंच आंबोली यांनी केले होते.

यावेळेस मा. zp सभापती अरुणशेठ चांभारे, आंभू चे सरपंच माऊलीशेठ कांबळे, प्रदीपशेठ शिंदे सरपंच औंढे,सचिन धंद्रे




उपसरपंच कुडे,सौ.काजलताई सावंत सरपंच विरहाम- भलवडी, सौ. अर्चनाताई साबळे सरपंच वाघू, सौ. सुमित्रताई चांभारे सरपंच सुपे- सातकरवाडी, मयुरीताई विठ्ठल शिंदे सरपंच टेकवडी , सतीश चांभारे साहेब, सोपान मेठल, मच्छिंद्र सातकर, उमेश सातकर, राजेश सावंत, हरेश कांबळे आखातुली,अजय कचरे घोटवडी हे मान्यवर उपस्थित होते तसेच इच्छुक उमेदवारांपैकी दिनेश हांडे तांबडेवाडी विरहाम, श्री रोहिदास मेठल तोरणे,आणि zp चे इच्छुक उमेदवार समीर सुपे हे देखील पाठिंबा देण्यासाठी आले होते त्यांचेही आभार!

तसेच आम्ही सर्वजण सार्वजनिक बांधकाम विभाग खेड या कार्यालयास देखील भेट दिली संबधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून पुढील ४/५ दिवसात पाऊस उघडला की काम चालू करू अस आश्वासीत केले आहे.

तहसीलदार साहेब आणि बांधकाम विभागाचे अधिकारी यांचेही आभार त्यांनी सहकार्याची भूमिका घेतली.

पच्छिम भागाच्या वतीने जे जे मान्यवर आले आणि ज्यांनी कोणी या विषयासाठी सहकार्य केले त्या सर्वांचे आभार.

## महाराष्ट्रात स्त्रीला आरक्षणाची नव्हे तर संरक्षणाची गरज आहे : हर्षदा साळुंके

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**

महाराष्ट्र एक संस्कृत ,विकसित राज्य असून संत महात्म्यांची भूमी आहे .पण हा महाराष्ट्र तसा संतांच्या विचारधारणेचे पालन करतो आहे का? हा प्रश्न उभा राहतो जो महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराज , शाहू , फुले, आंबेडकर यांचा आहे त्या महाराष्ट्रात राजमाता जिजाबाई ,रमाई अहिल्याबाई, सावित्रीला काही किंमत आहे की नाही? या वाक्यामागील अर्थ( स्त्रीला काय किंमत आहे की नाही) छत्रपती शिवरायांच्या काळात 'ती' आणि या काळातील 'ती' यात खूप फरक सांगता येईल. छत्रपती शिवरायांच्या काळात तिला काही कोणी त्रास दिला तर त्याचे हात पाय कलम केले जात .आता तसा कोणताच कलम नाही याचीच खंत वाटत आहे तिला शिकवण्यासाठी सावित्रीबाई यांनी खूप कष्ट घेऊन तिला पुढे आणली आणि आता तीच सुरक्षिततेत कमी पडू लागली.सध्याचा चर्चेत विषय आरक्षण खरंच आरक्षण समानतेला भेट पाडत आहे काय ?समाजात खोल दरी निर्माण करत आहे काय ?आरक्षणाला हिंसक वळण येऊन आपल्यात मतभेद निर्माण झाले आणि आपण धर्म, वंश, जात ,भाषा आणि लिंग यात विभागलो आणि हेच आतापर्यंत



जगलोआहे 50% आरक्षण ज्या स्त्रीसाठी संविधानाने राखीव ठेवले त्यापेक्षा महत्त्वाचं आहे तिचे संरक्षण.स्त्री ही कामवाली, सरपंच, खासदार, आमदार,एव्हाना राष्ट्रपती, पायलेट,लॉयर या पदांवर झळकत असताना तिच्या पार्श्वभूमीचा विचार कोणी केला आहे का? ती आज सुरक्षित नाही तिच्यावर अन्याय होतो अत्याचार देखील होतो तरी गुन्हेगार आपल्या हाताला लागत नाही हाच कायदा का आपला? त्यामागे राजकारण चालतं पण आपला समाज गप्पच असतो शेवटी एकच विनंती की स्त्रीला आरक्षण नको पण संरक्षण द्या. ही काळाची गरज आहे तरच आजची स्त्री उद्याची राणी लक्ष्मीबाई असेल.

## बोगस मतदारांविरोधात मनसेचा 'सत्याचा मोर्चा' खऱ्या मतदारांना सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर खोट्या व बोगस मतदारांची नोंद झाल्याच्या तक्रारींवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आंदोलनाचा बिगुल वाजवला आहे. या पार्श्वभूमीवर मनसेतर्फे "सत्याचा मोर्चा" आयोजित करण्यात आला असून हा मोर्चा शनिवार, १ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता फॅशन स्ट्रीट, चर्चगेट, मुंबई येथे होती.या मोर्चाचे उद्दिष्ट बोगस मतदारांचे गैरप्रकार उघडकीस आणणे व मतदार याद्या शुद्ध करणे हे आहे. "लोकशाही प्रक्रियेत मतदार हेच केंद्रबिंदू आहेत. जर मतदार यादीच खोटी असेल, तर निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा



विश्वास ढळेल. त्यामुळे ही लढाई सत्य आणि पारदर्शकतेसाठी आहे," असे मनसेच्या नेत्यांकडून सांगण्यात आले.मनसेच्या आवाहनानुसार खरे मतदार, नागरिक संघटना आणि युवक मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी होण्याची शक्यता आहे. पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या मोर्चासाठी तयारीला लागले असून शहरातील विविध भागांत जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे.

या मोर्चाच्या माध्यमातून मनसेने निवडणूक आयोगाचे लक्ष वेधून घेण्याचा आणि मतदार याद्यांची पुनर्तपासणी करून खोट्या नोंदी हटविण्याचा ठाम इशारा दिला आहे. "जनतेचा आवाज दडपून लोकशाहीला गळचेपी देणाऱ्यांविरोधात आम्ही शांत बसणार नाही," असा इशारा पक्षाने दिला आहे."सत्याचा मोर्चा" हा फक्त आंदोलन नसून, सत्य, पारदर्शकता आणि स्वच्छ लोकशाहीसाठीचा संघर्ष असल्याचे मनसेने स्पष्ट केले आहे.